साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३१-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०६.०८.२०२६ | अंक नं. १०९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुद्ध चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

## विमान तिकीट व्यवसायात मोठ्या नफ्याचे आमिष दाखवून ४३ लाखांची फसवणूक

**'लिओ हॉलिडेज' च्या अजयकुमार जगतापवर आणखी एक गुन्हा दाखल**

नगर - विमानाच्या तिकिटांच्या व्यवसायात मोठा परतावा आणि नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ४३ लाख ४३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार अहिल्यानगर शहरात समोर आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात 'लिओ हॉलिडेज' च्या अजयकुमार जगताप याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यावर यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

याबाबत आदेश लुमाजी चेमटे (वय ३४, रा. इंद्रप्रस्थ कॉलनी, नागरदेवळे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांना आरोपी अजयकुमार बाळासाहेब जगताप (रा. भिस्तबाग, अहिल्यानगर) याने विश्वासात घेतले. 'लिओ हॉलिडेज' नावाच्या कंपनीद्वारे विमानाची तिकिटे खरेदी करण्याच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास खात्रीशीर परतावा आणि मोठा नफा मिळेल, असे आमिष आरोपीने दाखवले.

या आमिषाला बळी पडत फिर्यादी आदेश चेमटे यांनी १८ जुलै २०२२ ते ४ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत बुऱ्हाणनगर आणि गुलमोहर रोड परिसरात आरोपीला वेळोवेळी रोख स्वरूपात आणि धनादेशाद्वारे एकूण ९८ लाख रुपये दिले. त्यानंतर आरोपी अजयकुमार जगताप याने त्यापैकी ५४ लाख ५७ हजार रुपये परत केले. मात्र, उर्वरित ४३ लाख ४३ हजार रुपये परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली.

सतत पाठपुरावा करूनही पैसे परत न मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांकडे अर्ज दिला होता. अर्जाच्या चौकशीत फसवणुकीचा प्रकार स्पष्ट झाल्यानंतर ५ ऑगस्ट रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी अजयकुमार जगताप याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड करत आहेत.

## वीज पुरवठा खंडित झाल्याने शहरासह उपनगराचा पाणीपुरवठा झाला विस्कळीत

नगर - शहर पाणी पुरवठा योजनेच्या उच्च दाब वीज वाहिनीवर विळद पंपिंग स्टेशन परिसरात बिघाड निर्माण झाल्यामुळे ६ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजलेपासून सकाळी ७.१५ पर्यंत वीज पुरवठा खंडित झालेला होता. त्यामुळे शहरासह उपनगरी भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

सकाळी ७.१५ वाजता वीज पुरवठा सुरु झाल्यानंतर मुळानगर, विळद येथून बंद पडलेला टप्प्या-टप्प्याने पाणी उपसा सुरु करण्यात आला. त्यानंतर वसंतटेकडी येथे सकाळी ९.३० वाजता पूर्ण क्षमतेने पाणी उपसा सुरु झालेला आहे. परंतु पहाटेच्या व सकाळी पाणी वाटपाच्या वेळेतच सलग ५.३० तास पाणी उपसा बंद राहिल्याने शहर पाणी वितरणाच्या टाक्या पूर्ण क्षमतेने भरता आलेल्या नाहीत.

त्यामुळे ६ ऑगस्ट रोजी रोटेशननुसार पाणी वाटप होणारा मध्यवर्ती भाग म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडळी, कालू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोटी या भागात तसेच गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हिल हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसिपल हाडको या भागात पाणी उशिराने व कमी दाबाने पुरवठा होत आहे.

पाणी पुरवठा न झालेला भाग: तसेच बोल्हेगाव, नागापूर, पाईपलाईन रोड परिसर, ढवणवस्ती संपूर्ण परिसर, लेखनगर, संचारनगर या उपनगर भागास पाणी पुरवठा करता आलेला नाही. सदरचा पाणी पुरवठा हा ७ ऑगस्ट रोजी करण्यात येईल, असे महापालिकेच्यावतीने सांगण्यात आले.

## वारंवार अतिक्रमणे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे महापौरांनी आयुक्तांना दिले निर्देश

नगर - अहिल्यानगर शहरातील मुख्य बाजारपेठेतील वारंवार होणाऱ्या अतिक्रमणांमुळे नागरिक आणि व्यापारी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने या अतिक्रमणांवर सातत्याने कारवाई करण्याबरोबरच पुनरावृत्ती करणाऱ्या अतिक्रमणधारकांवर दंडात्मक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निर्देश अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योती गाडे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना दिले.

५ ऑगस्ट रोजी महापौर गाडे यांनी आयुक्त डांगे यांची भेट घेवून शहरातील अतिक्रमणांबाबत चर्चा केली व अतिक्रमणधारकांवर थेट कारवाईबाबत पत्र दिले. महापौर गाडे यांनी यावेळी म्हटले की, शहरातील मुख्य बाजार पेठ, गंजबाजार, सराफ बाजार, मोची गल्ली, कापड बाजार, घासगल्ली आदी परिसरात वारंवार अतिक्रमण हटाव मोहीम राबवूनही पुन्हा अतिक्रमणे होत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच व्यापारी वर्गाला मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने अतिक्रमणांविरोधात सातत्यपूर्ण कारवाई करावी. तसेच कारवाईनंतरही वारंवार अतिक्रमण करणाऱ्या अतिक्रमणधारकांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. गंज बाजार चौकातही मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे आहेत. ही सर्व अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

यावर आयुक्त डांगे यांनीही वारंवार अतिक्रमणे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेच लागतील, असे सांगत अतिक्रमणविरोधी पथकालाही तशा सुचना दिल्याचे सांगण्यात आले. शहरातील गंजबाजार, सराफ बाजार, मोची गल्ली, कापड बाजार, घासगल्ली या परिसरात महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून नियमित कारवाई सुरु असते. मात्र, पथक गेल्यानंतर परिस्थिती जैसे थे होते.

आता याविरोधात कडक कारवाईची पावले उचलावी लागतील, वारंवार अतिक्रमणे करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करावी लागेल, असे आयुक्त डांगे म्हणाले.

## सोने-चांदीच्या दरात पुन्हा झाली वाढ

दिल्ली - सोने व चांदीच्या दरात ६ ऑगस्ट रोजी वाढ झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (खइग) नुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव २,७३५ रुपयांनी वाढून १.४८ लाख रुपयांवर पोहोचला आहे.

एक किलो चांदीचा भाव ९३१ रुपयांनी वाढून २.२५ लाख रुपयांवर पोहोचला आहे. या महिन्यात म्हणजेच ऑगस्टमध्ये केवळ ६ दिवसांत सोने ५,५०१ रुपयांनी आणि चांदी ७,१९८ रुपयांनी महाग झाली आहे.

या वर्षी सोन्या-चांदीच्या दरात सातत्याने चढ-उतार दिसून येत आहे. सोने २०२६ मध्ये आतापर्यंत १५ हजार रुपयांनी महाग झाले आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी १० ग्रॅम सोने १.३३ लाख रुपयांच्या वर होते, जे आता १.४८ लाख रुपयांवर पोहोचले आहे. तर, चांदीच्या किंमतीत ५ हजार रुपयांची घसरण झाली आहे. चांदी ३१ डिसेंबर २०२५ रोजी २.३० लाख रुपये प्रति किलो होती, जी आता २.२५ लाख रुपयांवर आहे. या काळात २९ जानेवारी रोजी सोन्याने १.७६ लाख रुपये आणि चांदीने ३.८६ लाख रुपयांचा सर्वकालीन उच्चांक गाठला होता.

## महाराष्ट्रात पुन्हा मुसळधार पावसाचा इशारा; हवामान विभागाकडून 'ऑरेंज अलर्ट' जारी

मुंबई - राज्यात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळू शकतात. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांसाठी मात्र हवामान विभागाने कोणताही विशेष इशारा दिलेला नाही.

रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तसेच ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. पालघर, मुंबई आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळू शकतात. नाशिकच्या घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता असल्याने तेथे 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. मात्र, पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पाऊस होऊ शकतो. त्यामुळे पुणे व सातारा घाटमाथा परिसरात 'ऑरेंज अलर्ट', तर कोल्हापूर घाटमाथ्यावर 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. या दरम्यान ताशी ३० ते ४०किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यांसाठी कोणताही विशेष इशारा देण्यात आलेला नाही.

## कुणबी प्रमाणपत्रांवरून मनोज जरांगे पा. आक्रमक

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंवर केले गंभीर आरोप**



जालना - मराठा आरक्षणाच्या माध्यमातून मिळालेली कुणबी प्रमाणपत्रे आणि त्यांची जात वैधता रद्द केल्याच्या प्रकरणावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर घणाघाती हल्ला चढवला आहे. पत्रकार परिषदेत जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर 'मराठा समाजाचे वाटोळे करण्याचा कट' रचल्याचा थेट आरोप केला आहे. पुराव्यांचे ढीग सोबत घेऊन आलेल्या जरांगे यांनी अनेक गौप्यस्फोट करत महायुती सरकारला आगामी निवडणुकीत सळो की पळो करून सोडण्याचा इशारा दिला आहे.

जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर मराठा समाजासोबत दुटप्पी भूमिका घेत असल्याचा आरोप केला. जरांगे म्हणाले, शरद पवार आता म्हातारे झाले आहेत. त्यामुळे पक्षात एकनाथ शिंदे आणि अजित पवार हेच मराठ्यांचे नेते आहेत, असे समजून मराठा समाजाने महायुतीला जीवापाड प्रेम दिले आणि तुटून मतदान केले. पण आता हेच नेते आमच्या मुलांच्या मुंडक्यावर पाय देत आहेत.

एकनाथ शिंदे, तुमच्यावर माझा कधीच संशय नव्हता. पण मराठ्यांना विरोध करणारे ओबीसी नेते तुमच्या 'बाळासाहेब भवन'मध्ये येऊन बैठका करत आहेत. तुमच्याच पक्षाचे नेते (संजय शिरसाट आणि संदिपान भुमरे) यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील कॉलेजवर मराठ्यांच्या विरोधात आंदोलने रचली जात आहेत. तुम्ही आमच्याच लोकांचा वापर करून आमच्या पाठीत खंजीर खुपसत आहात. जेव्हा तुमचा पक्ष फुटला, तेव्हा आम्ही मराठ्यांनी तुमच्यावरील गद्दारीचा डाग पुसण्याचा प्रयत्न केला. पण तुम्ही अशीच फसवणूक करत राहिलात, तर 'उद्धव ठाकरेच बरे होते' असे म्हणायची वेळ आमच्यावर येईल आणि तसे म्हणायला आम्हाला वेळही लागणार नाही.

### तर २०-२५ आमदार पाडून दाखवेन

कुणबी नोंदी रद्द करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दबाव आणल्याचा मोठा गौप्यस्फोट जरांगे यांनी केला. बावनकुळे यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना 'एन्डोर्समेंट' करून कुणबी नोंदी तत्काळ रद्द करण्याचे पत्र दिल्याचे जरांगे यांनी पुराव्यासह सांगितले.

देवेंद्र फडणवीस तुम्ही एका बावनकुळेच्या नादी लागून मराठ्यांचे वाटोळे करत आहात. जर तुम्ही बावनकुळेला एवढी ताकद दिली असेल, तर याच बावनकुळेसाठी मी तुमचे राज्यातले २० ते २५ आमदार सहज पाडून दाखवेन. आता तुम्हीच ठरवा तुम्हाला बावनकुळे पाहिजे की मराठे?

### कागदपत्रांचे ढीग आणि राजकीय द्वेष

जरांगे यांनी काही विशिष्ट प्रकरणांचा दाखला देत राजकीय द्वेषापोटी सामान्य मुलांचे भवितव्य कसे उद्ध्वस्त केले जात आहे, हे स्पष्ट केले. ज्योतीताई हंडे या तुमच्या राजकीय विरोधक असतील, त्यांचा उमेदवार निवडून आला नाही म्हणून राजकीय द्वेषातून त्यांचे प्रमाणपत्र रद्द करा, आम्हाला काहीही देणेघेणे नाही. पण एका राजकारण्यासाठी दहीहंडे नावाच्या ३,००० लोकांचे वाटोळे का करत आहात? असा सवाल त्यांनी विखे पाटील आणि सत्ताधाऱ्यांना विचारला. यशवंता दहीहंडे यांची निझामकालीन उर्दू नोंद शिंदे समितीनेच शोधून ग्रामपंचायतीच्या भिंतीवर लावली होती. आज त्यांच्या नातवाने (विजय दहीहंडे) पॉलिटेक्निकला प्रवेश घेतला आहे, पण त्याची व्हॅलिडिटी नाकारली जात आहे. तुकडे बिले आणि जुन्या पावत्या असूनही जाणूनबुजून छळ केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

पांडुरंग बोडखे यांची उर्दू लिपीतील नोंद सापडली, त्याचे ट्रान्सलेशनही दिले. संजय बोडखे यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले. पण आता त्यांची मुले गौरव, गीतांजली आणि प्रसाद (जो कम्प्युटर सायन्सला आहे) यांची जात वैधता नाकारली जात आहे. मराठ्यांची पोरं सुखाने शिकायला लागली आहेत, ते तुमच्या डोळ्यात का खुपतंय? असा संताप त्यांनी व्यक्त केला.

### १५ लाखांच्या लाचेचा आरोप आणि नार्को टेस्टची मागणी

प्रमाणपत्र देण्यासाठी अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार सुरु असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. एका प्रकरणात अधिकाऱ्याने फोनवर नव्हे, तर प्रत्यक्ष भेटून १५ लाख रुपयांची लाच मागितल्याचा दावा त्यांनी केला. जर अधिकारी १५ लाख रुपये मागत नसतील, तर त्यांची 'नार्को टेस्ट' करा, असे आव्हान जरांगे यांनी सरकारला दिले आहे.

### भ्रष्टाचाराच्या फाईली उघडण्याचा इशारा

शेवटी राज्य सरकारला आणि मंत्र्यांना निर्वाणीचा इशारा देताना जरांगे म्हणाले की, मला एकटे पाडून जेलमध्ये टाकण्याचा कट रचला जात आहे. पण मी खूप खुनशी माणूस आहे. जर माझ्या नादी लागलात, तर राजकारण्यांचे सगळे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार बाहेर काढून तुम्हाला जेलमध्ये सडवेन. या पत्रकार परिषदेतून मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाचा लढा केवळ कागदपत्रांपुरता मर्यादित नसून, आता तो थेट राजकीय अस्तित्त्वाच्या लढाईत बदलत असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स, कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका!
ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर
मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बोल्हेगाव परिसरात बलात्काराची धमकी देत महिलेचा विनयभंग

### तरुणावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - बोल्हेगाव येथील सैनिक कॉलनी परिसरात राहणाऱ्या एका ४२ वर्षीय महिला मजुराचा विनयभंग करून तिला जीवे मारण्याची आणि बलात्काराची धमकी दिल्याप्रकरणी एका तरुणावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ५ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही बोल्हेगाव येथील सैनिक कॉलनी परिसरातून पायी जात असताना, उभा मारुती मंदिरासमोर राहणारा आरोपी केवीन चव्हाण हा त्याच्या मोपेड वाहनावरून तेथे आला. त्याने महिलेचा रस्ता अडवून तिला तू मला खूप आवडतेस, मला तुझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवायचे आहेत असे अश्लील वक्तव्य केले. तसेच, जर तिने या गोष्टीला नकार दिला तर तिच्यावर बलात्कार करण्याची थेट धमकी देऊन तिच्या विनयशीलतेला बाधा आणली.

या घटनेनंतर पीडित महिलेने त्वरित तोफखाना पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी केवीन चव्हाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९, ३५२ आणि ३५१ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

# कापड बाजारातील रोडचे काँक्रीटीकरण महिनाभरात पूर्ण होणार

### आ. संग्राम जगताप; अतिक्रमण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची सूचना

नगर - अहिल्यानगर शहरातील मुख्य बाजार असलेल्या कापड बाजार परिसरातील एमजी रोडच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला प्रारंभ झाला असून हे काम एक ते सव्वा महिन्यांत पूर्ण केले जाईल, अशी माहिती आमदार संग्राम जगताप यांनी दिली. कामाचा दर्जा उत्कृष्ट राहावा यासाठी दररोज एक ते दोन वेळा स्वतः पाहणी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

काँक्रीटीकरणाच्या कामाला प्रारंभ झाल्यानंतर आ. संग्राम जगताप यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासोबत आराखड्याची पाहणी करून कामाच्या नियोजनाबाबत चर्चा केली. यावेळी महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, कोतवाली पोलीस निरीक्षक देशमुख तसेच परिसरातील व्यापारी उपस्थित होते.



एमजी रोडच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला प्रारंभ झाल्यानंतर पाहणी करून महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी चर्चा करताना आमदार संग्राम जगताप. (छाया - धनेश कटारिया)

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, कापड बाजारातील रस्ता नियोजित वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांना खरेदीसाठी तसेच व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी मोठी सुविधा उपलब्ध होईल. रस्त्याचे काम उत्कृष्ट दर्जाचे करण्यावर भर देण्यात येणार असून व्यापाऱ्यांनी कोणतीही चिंता करू नये. कामाच्या काळात कोणीही अडथळे निर्माण करू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.

शहरातील सराफ बाजार, गंज बाजार, मोची गल्ली, कापड बाजार आणि डाळ मंडई या प्रमुख बाजारपेठांमध्ये अतिक्रमणामुळे नागरिकांना ये-जा आणि वाहनतळाच्या सुविधांवर परिणाम होत असल्याचे सांगत त्यांनी दुकानदारांनी आपले साहित्य रस्त्यावर न मांडण्याचे आवाहन केले. सार्वजनिक रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वारंवार अतिक्रमण करणारे व्यापारी किंवा अतिक्रमणधारक महापालिकेच्या कारवाईकडे दुर्लक्ष करत असल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी सूचनाही आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी केली.

# नगरी व्हिलेजजवळ तरुणांवर चाकू आणि लोखंडी वस्तूने हल्ला

### पाच जणांवर गुन्हा दाखल; पूर्ववैमनस्यातून हल्ला झाल्याचा संशय

नगर - शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारी डोके वर काढत असल्याचे चित्र समोर आले आहे. तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बंधन लॉन परिसरात नगरी व्हिलेज जवळ पूर्ववैमनस्यातून तरुणावर चाकू व लोखंडी वस्तूने खुनी हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पीडित तरुणाच्या तक्रारीवरून पोलिसांनी पाच अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सिद्धार्थनगर येथील रोहित सुरेश शिंदे (वय २४) हा तरुण आपल्या एका मित्रासोबत नगरी व्हिलेजजवळ उभा असताना दोन अनोळखी मुलांनी त्याच्याशी विनाकारण वाद घातला. आरोपींनी त्याला लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करत शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी फोन करून आणखी तीन साथीदारांना बोलावून घेतले. काही वेळातच घटनास्थळी आलेल्या तिघांनी हातातील लोखंडी टणक वस्तू व धारदार चाकूने रोहित याच्यावर हल्ला चढवला. आरोपींनी त्याच्या डोक्यात, पाठीवर, छातीवर आणि डाव्या हातावर वार करून त्याला गंभीर जखमी केले. यावेळी रोहितचा मित्र तनीष गोलाप गुजर हा मध्यस्थी करण्यासाठी गेला असता, आरोपींनी त्याच्या डोक्यातही चाकूने वार करून त्याला दुखापत केली.

घटनेनंतर दोन्ही जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी रोहित शिंदे याने दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात पाच अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली मार्गावरील अतिक्रमणे मनपाच्या पथकाने हटविली

नगर - अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचा मार्ग सुकर करण्यासाठी महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने ६ ऑगस्ट रोजी सकाळीच अतिक्रमणे हटविण्याची मोहिम राबविली. संपूर्ण रॅली मार्गावर रॅलीच्या पुढे या पथकाने कारवाई करीत रॅली मार्ग मोकळा केला.

अहिल्यानगर शहरात व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी आणि जनजागृती वाढवण्यासाठी जिल्हा पोलीस दलातर्फे विशेष रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या रॅलीच्या मार्गात काही ठिकाणी अनधिकृत हातगाड्या, टपऱ्या आणि फ्लेक्स बोर्डमुळे रॅलीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाला रॅली मार्गावरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ६ ऑगस्ट रोजी सकाळीच अतिक्रमण विभागाचे पथक वाहनासह रॅली मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी दाखल झाले. रॅली मार्गावरील हातगाड्या, फ्लेक्स बोर्ड तसेच रस्त्यावरच बसलेले भाजीविक्रेते, पथारीवाले यांना हटवून रस्ता पूर्णपणे मोकळा केला.

ही कारवाई अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेमध्ये क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे यांच्या पथकाने प्रत्यक्ष सहभाग घेत कारवाई यशस्वी केली. महापालिकेच्या या वेगवान आणि कठोर भूमिकेमुळे रॅली विनाअडथळा पार पडण्यास मोठी मदत झाली असून, नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.





रॅली मार्गावरील अतिक्रमणे काढताना महापालिकेचे पथक. दुसऱ्या छायाचित्रात जप्त केलेली हातगाडी वाहनातून नेण्यात आली.

# उद्योजकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

### एमआयडीसीतील कचरा, वीज व ईएसआयसी रुग्णालयाच्या प्रश्नांवर संवाद साधत प्रत्यक्ष केली पाहणी

नगर - आमी संघटनेच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांच्या उपस्थितीत उद्योजक संवाद बैठक पार पडली. या बैठकीत एमआयडीसी परिसरातील कचरा व्यवस्थापन, वीजपुरवठा, ईएसआयसी रुग्णालय उभारणी, पाणीपुरवठा, औद्योगिक सुविधा तसेच विविध प्रलंबित प्रशासकीय प्रश्नां वर सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.



एमआयडीसी परिसरातील समस्यांची पाहणी करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, समवेत उद्योजक.

बैठकीच्या प्रारंभी आमी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही बैठक केवळ औपचारिक नसून उद्योग क्षेत्र आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी एमआयडीसीतील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून त्यामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत.असल्याचे निदर्शनास आणून दिले. काही ठिकाणी कचरा साचणे, सांडपाणी तुंबणे आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच एमआयडीसीमध्ये ईएसआयसी रुग्णालय उभारणीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून हजारो कामगारांच्या दृष्टीने तो अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी प्रशासनाच्या सहकार्यामुळे एमआयडीसीतील रस्ते, पथदिवे आदी काही प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त करत उर्वरित प्रश्नं वरही तितक्याच वेगाने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. बैठकीत उद्योजकांनी नवीन उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या सीएनजी गॅस मीटरची कमतरता, तसेच भविष्यात अपुरा पडणारा वीजपुरवठा तसेच पाणीपुरवठ्याच्या अडचणी मांडल्या. अनेक उद्योग सुरू होण्यास तयार असून मूलभूत सुविधांच्या अभावामुळे गुंतवणूकदारांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर उत्तर देताना जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया म्हणाले उद्योग क्षेत्राच्या अडचणी प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. उद्योजकांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधून तातडीने निर्णय घेतले जातील. कोणताही प्रश्न केवळ कागदावर राहणार नाही, तर त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही होईल.

ते पुढे म्हणाले की, नवीन सबस्टेशन उभारण्यास काही कालावधी लागणार असला तरी आहेत त्या सबस्टेशनमध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसवून वीज क्षमतेत वाढ करण्याचा प्रस्ताव तातडीने पुढे नेण्यात येईल. सीएनजी गॅस मीटर उपलब्धतेबाबतही संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून लवकरात लवकर मार्ग काढला जाईल.कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर त्यांनी अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना देत, ज्या ठिकाणी कचरा साचला आहे किंवा सांडपाणी तुंबले आहे त्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. संबंधित विभागांना तातडीने स्वच्छता मोहीम राबविणे, कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि जबाबदार यंत्रणांवर आवश्यकता ती कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

ईएसआयसी रुग्णालयाच्या प्रश्नाबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांशी पाठपुरावा करून हा विषय शासन स्तरावर प्रभावीपणे मांडण्याचे आश्वासन दिले. बैठकीच्या शेवटी डॉ. पंकजा आशिया यांनी प्रशासन आणि उद्योग क्षेत्र यांच्यात सातत्याने संवाद राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. उद्योग वाढले तर रोजगार वाढेल आणि जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल. त्यामुळे उद्योजकांच्या रास्त मागण्यांवर प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रवीण जुंद्रे, सतीश गवळी, सागर निंबाळकर, सुमित सोनवणे, प्रकाश गांधी, सचिन पाठक, अमोल घोलप, गणेश कोलार, संजय बंदिष्टी, अनिल लोढा, मिलिंद कुलकर्णी, पुरुषोत्तम नावंदर, संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मैत्रीणीच्या घरातून सोने चोरणाऱ्या तरुणीला पोलिसांनी केली अटक

### ९ लाख रुपयांचे सात तोळे सोने व २ लाख रुपयांची रोकड जप्त

नगर - मैत्रीणीच्या घरातून लाखोंचे सोने चोरणाऱ्या तरुणीला पोलिसांनी पकडले असून तिच्याकडून ९ लाख रुपये किमतीचे सात तोळे सोने आणि दोन लाख रुपये रोख रक्कम जप्त केली आहे. गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या २ दिवसांत कोतवाली पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

याबाबत प्रीती बबन बोठे (रा. विद्यानगर, आरणगाव रोड, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार २९ जुलै रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान त्यांच्या मैत्रिणीने मोबाईलवर मेसेज करून मला मुलगा बघण्यास येणार असल्याने साडी पाहिजे असल्याचे सांगितले. त्यानंतर ती दुपारी ३.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादीच्या घरी आली. घरातील ज्या कपाटात दागिने ठेवलेले होते, त्याच ठिकाणी साड्या ठेवलेल्या होत्या. मैत्रिणीने ती खोली साडी घालून बघण्यासाठी घेतली, तर फिर्यादी दुसऱ्या रूममध्ये होत्या. थोड्या वेळाने ती मैत्रीण दोन साड्या घेऊन निघून गेली. पुढे १ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजेच्या दरम्यान बचत गटाचे पैसे देण्यासाठी कपाटाकडे गेले असता, कपाटातील सोन्याचे दागिने आणि पैसे दिसून आले नाहीत. यामुळे मैत्रिणीनेच आपले सोने व पैसे चोरून नेल्याची खात्री फिर्यादीची झाली. या प्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.


तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्ह्याचा तपास केला असता, हा गुन्हा फिर्यादीच्या मैत्रिणीनेच केल्याची खात्री पटली. त्यानंतर आरोपीस तात्काळ ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, तिने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात चोरी केलेले एकूण ९ लाख रुपये किमतीचे सात तोळे सोने आणि दोन लाख रुपये रोख रक्कम आरोपी महिलेकडून पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे हे करत आहेत.

## लिलाबाई कासवा यांचे दु:खद निधन



जामखेड - येथील रहिवासी लिलाबाई पृथ्वीराज कासवा (वय ८३) यांचे ५ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ६ ऑगस्ट रोजी जामखेड येथील तपनेश्वर रोड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभय कासवा, किशोर कासवा, अनिता पटवा यांच्या त्या मातोश्री होत.

## माजी ग्रा.पं. सदस्य भगवंतराव जाधव यांचे निधन



नगर-अकोळनेर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य तसेच रयत शिक्षण संस्थेशी प्रदीर्घ काळ जोडलेले ज्येष्ठ समाजसेवक भगवंतराव बळवंतराव जाधव (वय ९१) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अकोळनेर व परिसरात शोककळा पसरली आहे.

त्यांनी अकोळनेर ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून सलग २० वर्षे यशस्वीपणे काम पाहिले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजचे माजी उपप्राचार्य प्रा. विलास जाधव व स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य कैलास जाधव यांचे ते वडील होते.

# सीसीएमपी नोंदणी प्रस्तावाविरोधात 'आयएमएचा' एल्गार

### आपत्कालीन सेवांसह वैद्यकीय सेवा बंदचा इशारा; सिव्हिल हॉस्पिटल ते जिल्हाधिकारी कार्यालयावर डॉक्टरांचा मोर्चा

नगर - सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए)च्या हाकेला प्रतिसाद देत आयएमए अहिल्यानगर शाखेच्या वतीने गुरुवारी सिव्हिल हॉस्पिटल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा निषेध मोर्चा काढला.



आयएमए अहिल्यानगर शाखेच्या वतीने सिव्हिल हॉस्पिटल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. (छाया - समीर मन्यार)

यावेळी नायब तहसीलदार किरण बेरड यांना निवेदन देऊन शासनाने हा प्रस्ताव तातडीने मागे घ्यावा, अन्यथा आपत्कालीन सेवांसह सर्व वैद्यकीय सेवा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सीसीएमपी पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याचा प्रस्ताव आधुनिक वैद्यकशास्त्राची गुणवत्ता, वैज्ञानिक आधार आणि वैद्यकीय व्यवसायाची विश्वासार्हता धोक्यात आणणारा आहे.

या निर्णयामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेवर आणि सार्वजनिक आरोग्यावर दूरगामी परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. शासनाकडे वारंवार निवेदने, पत्रव्यवहार आणि पत्रकार परिषदांद्वारे भूमिका मांडूनही समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याने हे आंदोलन हाती घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

आयएमए महाराष्ट्र राज्याच्या निर्णयानुसार ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पुढील सूचना मिळेपर्यंत आपत्कालीन सेवांसह वैद्यकीय सेवा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

मोर्चामध्ये आयएमए अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिव डॉ. अमित करडे, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. निसार शेख, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ. सी. डी. मिश्रा, डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. सागर झावरे, डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. प्राजक्ता पारदे, डॉ. विजय पाटील, डॉ. अभिजित पाठक, डॉ. एस. एस. दीपक, डॉ. वसंत कटारिया, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. पांडुरंग डौले, डॉ. राहुल पंडित, डॉ. पोपट कर्डिले, डॉ. कृष्णा बलदवा, डॉ. अर्जुन शिरसाट यांच्यासह शहर व जिल्ह्यातील मोठ्या संख्येने डॉक्टर सहभागी झाले होते.

# गृहिणी

## आरोग्य

### वजन कमी करण्यासाठी करा हे उपाय

वजन कमी करणे म्हणजे फक्त कमी खाणे नव्हे, तर शरीराला योग्य सवयी लावणे आहे. सकाळी उठल्यावर सर्वात आधी कोमट पाणी प्यावे. त्यात अर्धा लिंबू पिळून आणि थोडे मध टाकल्याने पोट साफ होते, चरबी वितळायला मदत होते आणि दिवसाची सुरुवात ताजीतवानी होते. दिवसभरात वेगवेगळी पेये घेतल्याने शरीराला फायदा होतो आणि कंटाळाही येत नाही. जेवणापूर्वी एक ग्लास साधे पाणी प्यावे, त्यामुळे जास्त खाल्ले जात नाही. दुपारी जेवणानंतर जिरे पाणी किंवा बडीशेप भिजवले पाणी पिणे चांगले. त्याने पोट फुगत नाही आणि अन्न नीट पचते. संध्याकाळी थकवा आला तर ग्रीन टी किंवा आल्याचा चहा साखर न टाकता घेऊ शकता. रात्री झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात दालचिनी पावडर टाकून प्यायल्याने रात्री शरीरातील चरबी कमी होण्याची प्रक्रिया चालू राहते. उन्हाळ्यात ताक आणि हिवाळ्यात मेथीचे पाणी देखील पोटासाठी आणि वजनासाठी उपयुक्त आहे. पेयांसोबत जेवणही तितकेच महत्त्वाचे आहे. घरचे साधे जेवण ठेवावे. पोळी, भाजी, डाळ, भात आणि कोशिंबीर असे संतुलित जेवण करावे. तळलेले पदार्थ, जास्त गोड, मैदा आणि बाहेरचे खाणे शक्यतो टाळावे. जेवण वेळेवर करावे आणि रात्रीचे जेवण लवकर संपवावे. झोपण्याच्या तीन तास आधी पोट रिकामे ठेवले तर पचन चांगले होते. शेवटी शरीराला हालचाल देणे गरजेचे आहे. रोज किमान अर्धा तास चालणे, घरकाम करणे किंवा आवडीचा व्यायाम करणे आवश्यक आहे. यासोबत रात्री सात ते आठ तास शांत झोप घेतली पाहिजे. कारण कमी झोपेमुळे भूक वाढते आणि वजन कमी होण्यात अडचण येते. थोडक्यात, योग्य पेये, वेळेवर जेवण, नियमित हालचाल आणि पुरेशी झोप या चार गोष्टी सांभाळल्या तर वजन हळूहळू कमी होते आणि तब्येतही निरोगी राहते.

## पाककला

### पोहा कटलेट

**साहित्य :** पोहे २ वाटी, उकडलेला बटाटा २ मध्यम, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, बारीक चिरलेली हिरवी मिरची १, आले लसूण पेस्ट १/२ चमचा, ब्रेडचा चुरा १/२ वाटी, तांदळाचे पीठ २ चमचे, चाट मसाला १ चमचा, गरम मसाला १/४ चमचा, हळद १/४ चमचा, मीठ चवीनुसार, तळण्यासाठी तेल

**कृती :** पोहे स्वच्छ धुऊन १० मिनिटे पाण्यात भिजवून ठेवा. नंतर पाणी निथळून घ्या. एका भांड्यात भिजवलेले पोहे, कुस्करलेला बटाटा, कांदा, कोथिंबीर, हिरवी मिरची आणि आले लसूण पेस्ट घाला. त्यात चाट मसाला, गरम मसाला, हळद आणि मीठ घालून सर्व मिश्रण एकजीव करा. मिश्रण घट्ट होण्यासाठी त्यात ब्रेडचा चुरा आणि तांदळाचे पीठ मिसळा. तयार मिश्रणाचे लहान लहान गोळे करून हाताने चपटे कटलेट आकार द्या. कढईत तेल गरम करा. मध्यम आचेवर कटलेट दोन्ही बाजूने खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या. अतिरिक्त तेल निथळण्यासाठी टिश्यू पेपरवर काढा. तयार गरमागरम पोहा कटलेट हिरव्या चटणी आणि टोमॅटो केचपबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### छतासाठी वास्तू

छतावर बांधकाम करायचे असल्यास ते नैऋत्य दिशेला करावे. ईशान्य कोपरा मोकळा आणि हलका ठेवावा. तिथे कोणतेही जड बांधकाम करू नये. छताच्या मध्यभागी पाणी साठू देऊ नये. छतावरून पाणी दक्षिण किंवा पश्चिम भिंतीवरून खाली पडेल असे करू नये. छतावर कचरा, भंगार किंवा तुटलेल्या वस्तू साठवू नयेत.

## सौंदर्य

रात्री मेकअप न काढल्यास त्वचेची छिद्रे बुजतात आणि पिंपल्सची समस्या वाढते. त्यामुळे झोपण्यापूर्वी क्लिन्झरने चेहरा स्वच्छ करावा.

## सल्ला

एका छोट्या वाटीत कापूर जाळून त्यावर ३-४ लवंग टाका. धूर बाथरूममध्ये ५ मिनिटे राहू द्या. गोम लगेच पळून जातात. बाथरुममध्ये ओलावा राहू देऊ नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, कृत्तिका १८।४३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. १२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** मन शांत ठेवाल. घरातील मोठ्यांचे आशीर्वाद लाभतील.

**वृषभ :** आर्थिक बाजू मजबूत राहील आणि खर्च कमी होईल.

**मिथुन :** विचारांमध्ये गोंधळ राहील पण संध्याकाळपर्यंत मार्ग सापडेल. लहान प्रवासाचे योग आहेत.

**कर्क :** भावनिक दिवस आहे, जवळच्या लोकांची काळजी घ्याल.

**सिंह :** कामात मान्यता मिळेल आणि आत्मविश्वास वाढेल. कुटुंबासोबत वेळ चांगला जाईल.

**कन्या :** नवीन जबाबदारी मिळण्याचे संकेत आहेत. शांतपणे निर्णय घ्याल.

**तूळ :** समतोल राखल्याने दिवस चांगला जाईल. लोकांची मदत मिळेल.

**वृश्चिक :** मनात जुन्या आठवणी येतील. मेहनतीचे फळ लवकरच मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**धनु :** शिक्षण आणि ज्ञानात प्रगती होईल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** कामाचा वेग वाढेल आणि योजना पुढे जातील. घरात आनंदाचे वातावरण राहील.

**कुंभ :** विचार स्पष्ट होतील आणि नवी दिशा मिळेल. मित्रांची साथ लाभेल.

**मीन :** स्वप्नपूर्तीसाठी आज चांगला दिवस आहे. मन प्रसन्न आणि शांत राहील.

## फिल्मीचक्कर क्र. १२४८ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | ५ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | |
| ६ | | ■ | ■ | ७ | | ८ | |
| | ■ | ९ | | | ■ | | ■ |
| १० | | | ■ | ■ | ११ | | |
| | ■ | | ■ | ■ | १२ | | ■ |
| | ■ | १३ | | ■ | | ■ | १४ |
| १५ | | | ■ | १६ | | | |

**आडवे शब्द :-** १) 'अर्धसत्य, उंबरठा' आदी चित्रपटांची नायिका ४) सदाबहार दिवंगत अभिनेता - ++ आनंद ६) जब ++ है जान (चित्रपटाचे नाव) ७) दूरदर्शनवर एकेकाळी गाजलेली बहारदार गीतांची मालिका ९) +++ धन (चित्रपटाचे नाव) १०) मुख्य प्रधान या अर्थाचा शब्द ११) बाळा गाऊ कशी मी +++ (मराठी चित्रपट) १२) झूक ++ आसमान (चित्रपटाचे नाव) १३) ++ लागू (एक चरित्र अभिनेत्री) १५) +++ देव (मराठी अभिनेत्याचे नाव) १६) भारत-चीन युद्धावर आधारित एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) 'चौकट राजा' या मराठी चित्रपटाची दिवंगत नायिका २) हम ++ पास है (चित्रपटाचे नाव) ३) नृत्यासाठी प्रसिद्ध असलेली जुन्या काळातील एक अभिनेत्री ५) +++ देसाई (एक दिवंगत संगीतकार) ८) ++++ पत्थरोंने (जितेंद्रचा नायक म्हणून पहिला चित्रपट) ९) अमिताभ बच्चन, विनोद खन्ना, नितू सिंग, शबाना आझमी, अमजदखान यांचा एक चित्रपट ११) मै तुलसी तेरे ++++ (चित्रपटाचे नाव) १४) आखरी ++ (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** चांगले कर्म करा आणि फळाची चिंता करू नका, वेळ आल्यावर सगळे चांगलेच होते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### रात्रीच्या वेळी स्वयंपाकघरात सर्वाधिक झुरळे का असतात?

रात्रीच्या वेळी स्वयंपाकघरात सर्वाधिक झुरळे दिसण्यामागे अनेक कारणे आहेत. झुरळे हे मुळातच निशाचर किटक आहेत. याचा अर्थ ते दिवसा अंधाऱ्या, सुरक्षित ठिकाणी लपून बसतात आणि रात्र झाली की अन्नाच्या शोधात बाहेर पडतात. स्वयंपाकघर हे त्यांच्यासाठी एक आदर्श ठिकाण आहे कारण इथे त्यांना जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी मिळतात. दिवसभर स्वयंपाक होत असल्याने फरशीवर, गॅसजवळ आणि स्लॅबवर पिठाचे कण, साखरेचे दाणे, तेलाचे डाग आणि अन्नाचे तुकडे पडले असतात.

झुरळांना विशेषतः गोड आणि तेलकट पदार्थांची खूप आवड असते. रात्री घरातील सर्वजण झोपले की त्यांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय हे अन्न खाता येते म्हणूनच ते मोठ्या संख्येने बाहेर येतात.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे पाणी आणि ओलावा. झुरळे अन्नाशिवाय बरेच दिवस जगू शकतात परंतु पाण्याशिवाय ते जास्त काळ जगू शकत नाहीत. स्वयंपाकघरातील सिंक, नळ, फ्रीजच्या मागे आणि ओल्या फडक्यांमुळे तिथे नेहमीच ओलावा राहतो. विशेषतः पावसाळ्यात हा ओलावा अजून वाढतो. पाणी पिण्यासाठी आणि अंडी घालण्यासाठी झुरळे रात्रीच्या शांत वेळेत सिंकजवळ आणि नळाजवळ येतात.

तिसरे कारण म्हणजे उबदारपणा आणि लपण्याची जागा. गॅस शेगडी, मिक्सर आणि फ्रीज यांच्यामुळे स्वयंपाकघर नेहमीच उबदार असते. झुरळांच्या वाढीसाठी आणि प्रजननासाठी हे तापमान खूप पोषक असते. याशिवाय गॅसच्या मागे, कपाटांच्या भेगांमध्ये, फ्रीजच्या खाली अशा अनेक अंधाऱ्या आणि अरुंद जागा स्वयंपाकघरात असतात. दिवसा ते याच जागांमध्ये लपून बसतात आणि रात्री अंधार झाल्यावरच बाहेर पडतात.

या सर्व कारणांमुळे रात्रीच्या वेळी स्वयंपाकघर झुरळांसाठी एक प्रकारचे स्वर्गच बनते. अन्न, पाणी, उबदारपणा आणि सुरक्षितता या चारही गोष्टी इथे मिळत असल्याने रात्री स्वयंपाकघरात झुरळे सर्वात जास्त प्रमाणात दिसून येतात.

### ज्ञानाचे बीज

एका गावात अर्जुन नावाचा मुलगा राहत होता. तो खूप हुशार होता पण त्याला अभ्यासाचा कंटाळा यायचा. मोबाईल आणि टीव्ही यातच त्याचा सगळा वेळ जायचा. त्याचे वडील एका शाळेत शिक्षक होते. त्यांनी अर्जुनला अनेकदा सांगितले बाळा, पुस्तक हाच खरा मित्र आहे पण अर्जुन ऐकत नव्हता.


एके दिवशी वडिलांनी त्याला एक जुने पुस्तक दिले आणि म्हणाले हे वाचून बघ, यात एक गोष्ट आहे. अर्जुनने नाईलाजाने ते पुस्तक उघडले. ती गोष्ट एका शेतकऱ्याची होती. तो शेतकरी रोज कष्ट करायचा पण त्याला फळ मिळत नव्हते. एके दिवशी त्याला एक म्हातारा भेटला आणि म्हणाला बीज जमिनीत पेरल्याशिवाय पीक येत नाही. त्यासाठी पाणी, मेहनत आणि वेळ द्यावा लागतो. शेतकऱ्याने तसेच केले आणि काही महिन्यांनी त्याचे शेत सोन्यासारखे पिकले.

ही गोष्ट वाचल्यावर अर्जुनला विचार करायला लावला. त्याला समजले की ज्ञानाचे बीज हे पुस्तकात असते. ते वाचले नाही, मेहनत केली नाही तर यश मिळणार नाही. दुसऱ्या दिवसापासून अर्जुनने रोज १ तास पुस्तक वाचायला सुरुवात केली. हळूहळू त्याला वाचनाची गोडी लागली. परीक्षेत तो पहिला आला.

काही वर्षांनी अर्जुन मोठा अधिकारी झाला. तेव्हा तो नेहमी म्हणायचा माझ्या यशामागे त्या एका पुस्तकाचा आणि वडिलांच्या शब्दांचा हात आहे.

**बोध :** पुस्तक हा माणसाचा सर्वात चांगला मित्र आहे. पुस्तक आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेते. जे ज्ञान आपल्याला अनुभवाने मिळवायला वर्षे लागतात, ते पुस्तक काही तासात आपल्याला देऊन जाते. म्हणून रोज थोडे का होईना पण वाचन केले पाहिजे.

## आत्मशक्ति



### ज्योतिर्मय प्रकाश

आम्हाला खऱ्या परिस्थितीची जाणीव होत नाही. त्यांना दूर केल्यावर आम्हाला जीवनाचे ऐक्य, खऱ्या रुपाने समजेल.संत दर्शनसिंह महाराजांनी म्हटले आहे, नाम है आदमी तो क्या, असल में रहे इश्क हूँ। सारी जमीं है मेरा घर सारा जहाँ मेरा वतन ।। (मनुष्य असला म्हणून काय झाले ?

मी तर प्रेमपूर्ण आत्मा आहे. ही सारी वसुंधरा माझे घर आहे तर सारे जग माझा देश आहे.)स्वत:ला न ओळखल्यामुळेच आम्ही एकमेकांना वेगवेगळे समजतो.आम्ही स्वत:च्या आत्म्याला ओळखून एकमेकांशी जोडू शकतो आणि ह्या पृथ्वीवरील सर्व माणसामाणसांत सामंजस्य आणि शांती निर्माण करू शकतो. इतरांना जवळ करा आत्मा ज्योतिर्मय आणि प्रेमयुक्त आहे!

विशाल दृष्टीकोनातून इतर माणसांकडे पाहिले तर आम्हाला प्रत्येक आत्म्यांत झगमगणारा प्रकाश दिसेल. विमानातून जेव्हा आम्ही रात्री खाली बघतो तेव्हा सर्वत्र प्रकाश दिसून येतो अगदी तसेच दिसेल! प्रत्येक त्म्यात सारखाच प्रकाश असतो.

परमेश्वर अशा ज्योतिर्मय प्रकाशात भेदभाव करीत ही, कारण ते सारे त्याचेच अंश आहेत! फरक पडतो तो फक्त माणसांच्या बाह्य रुपाने आणि वातावरणामुळे! जेव्हा आम्ही आत्म्याशी जोडले जातो तेव्हा आम्हाला स्पष्ट कळते की आम्ही परम `श्वरासारखेच चैतन्यमय आहोत. आमच्या सर्वांच्या शरीरात आत्मा वास करतो आहे म्हणजे अंतरी आम्ही सर्वजण एकसारखे आहोत असेच स्पष्ट होते. आम्हा सर्वांत प्रेम, चैतन्य, ज्योतिप्रकाश आणि अम रत्व आहे आणि म्हणूनच आम्ही एकाच कुटुंबाचे सदस्य आहोत!

याकरिता जर कोणी आम्हाला विचारले की, 'तुम्ही कोण आहात ?' तर आपले उत्तर हवे की, 'आम्ही सर्व 'मानव' आहोत.' आपल्या आईवडिलांचा विचार करा. त्यांच्यापूर्वीच्या पिढीतल्या ४ माणसांनी त्यांना (आईवडिलांना) जन्म दिला. त्यांनाही त्यांच्या पूर्वीच्या आठ लोकांनी जन्म दिला. त्याही पूर्वी ह्या आठ लोकांना पूर्वीच्या १६ लोकांनी जन्म दिला. आम्ही असेच मागे मागे गेलो तर स्पष्ट दिसेल की पूर्वी जनसंख्या कमी होती व असाच तो काळ होता की ते सर्वजण आमचे पूर्वज होते आणि आज आम्ही त्यांचे वारसदार आहोत. अशा काही शतकातील पूर्वजांचा विचार करून एक वंशवृक्ष तयार केला तर आम्हाला स्पष्ट

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आपले शरीर आपले विचार

मी दुखावलो गेलो कारण मला मी 'बदली' असल्यासारखं वाटलं. तरीही मी त्याच्या विनंतीला मान दिला आणि कार्यक्रमाला गेलो. पण मला वाटलं की, जर त्याला खरंच मला बोलवायचं होतं तर त्याने आधीच संपर्क साधायला हवा होता. आता मी कल्पना करू शकतो की जर एखादं बाळ त्याच्या आईवडिलांची पहिली पसंती नसेल तर ते कशा प्रकारे अस्वीकृती अनुभवेल ?

शिवानीदीदी : नाकारलं गेल्याची भावना बाळाला तीव्रतेने जाणवते कारण ते पूर्णतः आत्म्याच्या चेतनावस्थेत आहे. तुम्ही दुखावले गेलात कारण तुम्ही तर्काचा आणि बुद्धीचा आधार घेतला. तुम्ही तुमचं लक्ष तिथून वळवलं आणि कार्यक्रमाचा भाग बनलात. पण बाळ हे सगळं करू शकत नाही. ते फक्त स्पंदन स्वीकारू शकतं. त्यामुळे आपण सहज म्हणूनही कधी बाळाच्या लिंगाबद्दल चर्चा करू नये कारण बाळ सगळं ऐकत असतं.

सुरेश ओबेरॉय : बाळाच्या लिंगाबाबत अनेक घरांमध्ये चर्चा होतात. जर घरात पहिला मुलगा असेल तर आईवडिलांना दुसरी मुलगी हवी असते आणि याउलटही असतं.

शिवानीदी : आपण 'सहज म्हणून' अनेक गोष्टींबाबत चर्चा करत राहतो. पण हे बदलावं लागेल कारण बाळ ऐकतंय की संपूर्ण कुटुंबाला मुलगी हवी आहे पण तो एक मुलगा आहे. आत्म्यासाठी हा खोलवर असा अस्वीकृतीचा भाव आहे.बाळाबद्दल आपली फक्त एकच इच्छा असली पाहिजे ती म्हणजे ते आनंदी असावं आणि त्याची तब्येत चांगली असावी. असा विचार केला तर त्या आत्म्याला सकारात्मक संदेश जातो. आपल्या मनात त्या बाळाच्या तब्येतीबाबत साधी शंका जरी आली आणि आपण सतत काळजीत राहिलो तर आपल्या प्रत्येक विचाराचा परिणाम त्या आत्म्यावर आणि त्याच्या शरीरावर होईल.

आपलं शरीर आपले विचार स्वीकारतं. बाळाच्या शरीराची वाढ अजून होत असते आणि त्यामुळेच ते खूप संवेदनशील असतं. त्याला, 'तुझं हृदय निरोगी आहे, फुफ्फुसं चांगली आहेत,' असे सकारात्मक संदेश पाठवणं खूप चांगलं. आपण इतरांबरोबर आपल्या भूतकाळाची तुलना करून तणावपूर्ण विचारांची निर्मिती करता कामा नये.

सुरेश ओबेरॉय : लोक त्यांचं मूल कोणत्या दिवशी, कोणत्या वेळी जन्म घेणार ह्या बाबतही काळजी करतात. कारण त्याने त्या बाळाची रास आणि नक्षत्र ठरतं. आजकाल तर लोक शुभ काळात बाळाचा जन्म व्हावा म्हणून त्याच्या जन्माची वेळही ठरवतात

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आई : दिवसभर मोबाईलच बघत बसतोस!
मुलगा : आई, ज्ञान मिळवत असतो.

आई : मग परीक्षेत कमी मार्क का?
मुलगा : ज्ञान मिळालं...
पण प्रश्न वेगळे आले!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी कोणती?

– गोदावरी नदी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### गहू

खाणे आरोग्याच्या दृष्टीने हितावह नसते. म्हणून सहसा महाराष्ट्रातील 'पोळी' तसेच अन्यत्र असणारा जाड पराठा/बाटी खाणे आरोग्याच्या दृष्टीने हितावह असते. उपयोग : १) गव्हाच्या पिठात साखर आणि दूध घालून प्यायल्याने उष्णतेमुळे घुळणा फुटून नाकातून वाहणारे रक्त बंद होते. २) गव्हाच्या पिठात दूध व गायीचे साजूक तूप घालून ते पीठ चांगले मळून त्याचा पराठा/बाटी बनवावी. ही बाटी बलदायक, धातुवर्धक, वायुहारक, जड व कफकारक असल्याने जठराग्नी प्रदीप्त असणाऱ्यांसाठी अत्यंत उत्तम आहार आहे. ३) गव्हाची पोळी कोंड्यासह बनवावी, कारण कोंडा हा पिठापेक्षाही शरीराला उपकारक व पोषक असतो. तसेच उत्तम सारक असतो. या कोंड्यामुळे आतड्यांच्या व मलाशयाच्या हालचाली वाढतात, त्यामुळे आतड्यातील घट्ट मल पुढे सरकला जातो व शौचास सहज साफ होते. त्याचबरोबर कोंड्यामध्ये असणारे लोह व कॅल्शिअम घटक सहजरीत्या मिळतात.

४) गहू उगवून त्यापासून गव्हांकुर तयार केले जातात व या अंकुरातील 'क्लोरोफिल'चा शरीरातील विष बाहेर काढून शरीर शुद्ध करण्यासाठी, तसेच स्नायूंची बांधणी चांगली करण्यासाठी उपयोग होतो. म्हणून गव्हांकुर रस १०० मि.लि. एक आठवडाभर रोज प्यावा.

५) गव्हांकुरातील क्लोरोफिलमुळे हृदय व फुफ्फुसे कार्यक्षम होतात. त्याचबरोबर रक्तवाहिन्यांचे कार्य सुरळीत चालते. रक्तामधील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढल्यामुळे फुफ्फुसांना अधिक चालना मिळून ऑक्सिजन घेण्याचे प्रमाण वाढते व पर्यायाने संपूर्ण शरीराचेच कार्य सुरळीत चालते.

६) गव्हांकुराचा उपयोग त्वचारोगावरही चांगला होतो. त्वचा भाजणे, जखम होणे, दाह जाणवणे, चेहऱ्यावर काळे वांग येणे, चेहरा काळवंडणे, सुरकुत्या येणे या सर्व विकारांवर गव्हांकुराचा रस त्वचेवर लावल्यास वरील सर्व विकार दूर होतात.

७) गव्हांकुराचा उपयोग कान, डोळे, दात यांच्या सर्व विकारांवर, सांधेदुखी, मेंदूविकार, स्त्रियांमधील मासिक पाळीसंदर्भातील विकार, हॉर्मोन्सचे असंतुलन या सर्व विकारांवर होतो. तसेच थॅलेसिमिया, कॅन्सर या विकारांवरही गव्हांकुराचा उपयोग होतो. या विषयीचे संशोधन सध्या सुरू आहे. अनेक मोठ्या इन्स्टिटच्यूटमध्ये कॅन्सर व थॅलेसिमिया असणाऱ्या रुग्णांवर गव्हांकुराचा उपयोग केला जातो.

८) चेहऱ्यावर सुरकुत्या येऊन काळे वांग निर्माण झाले असतील, तर अशा वेळी गव्हांकुराचा कल्क चेहऱ्यावर हलक्या हाताने चोळावा. यामध्ये असणाऱ्या 'ई' जीवनसत्त्वामुळे त्वचा कांतियुक्त होऊन काळे वांग नष्ट होतात. (क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांतील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

# पद्मशाली सोशल फाउंडेशनच्या वतीने १५० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

नगर – शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडचणी विद्यार्थ्यांच्या आड येऊ नयेत, या उद्देशाने पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांतील १५० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे यंदाचे दहावे वर्ष असून गेल्या दशकभरात सुमारे १५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून फाउंडेशनने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गणेश अवधूत, इंजिनिअर प्रशांत कोक्कुल, इंजिनिअर अक्षय बल्लाळ, अमित सुंकी, बाबासाहेब तिपुले, राजू कोडम उपस्थित होते. यावेळी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, वरद लकशेट्टी, ओंकार आडेप, ओंकार जेटला यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे गणेश अवधूत म्हणाले, विद्यार्थ्यांना दिलेली प्रत्येक वही त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारी ठरते. शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची कमतरता कोणाच्याही प्रगतीच्या आड येऊ नये. समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन गरजू विद्यार्थ्यांना आधार दिला, तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडू शकतो. पद्मशाली सोशल फाउंडेशनने सातत्याने केलेले सामाजिक कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.

प्रास्ताविकात ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले, सामाजिक कार्यात सातत्य आणि सेवाभाव या दोन गोष्टींवर आमच्या संस्थेचा भर आहे. गेल्या दहा वर्षांत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे. यंदाही शहरातील विविध शाळांतील १५० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय वारकऱ्यांसाठी सेवा उपक्रम, महाप्रसाद, गरजू रुग्णांना मदत, आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना सहकार्य अशा अनेक सामाजिक उपक्रमांद्वारे फाउंडेशन सातत्याने समाजासाठी कार्यरत आहे.

ट्रस्टचे सचिव अजयकुमार लयचेट्टी म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन दरवर्षी हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने पुढे जातात. समाजातील दात्यांच्या सहकार्यामुळे अशा उपक्रमांना बळ मिळत असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

यावर्षी श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, महात्मा फुले विद्यामंदिर, दादा चौधरी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उक्कडगाव), प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, बालक मंदिर महिला मंडळ, सिताराम सारडा माध्यमिक विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, शारदा विद्यामंदिर, १०८ श्री महंत पंडित सुचासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय, श्रीमती पार्वतीबाई डहाणूरकर कन्या विद्यालय आणि महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर या शाळांमधील प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले. अमित सुंकी यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मंत्रातून चित्ताची एकाग्रता

“मुसाफिर”

संकलन: दिशान फिचर्स




मंत्र ही एक शक्ती आहे. ती आत्मबल वाढविणारी आहे. तिचा उपयोग मानसिक दुर्बलता आणि शारीरिक अस्वस्थता घालविणारा आहे. मंत्र व्यक्तिगत कल्याण साधणारे आहेत. इतरांना पीडा देण्यासाठी नाहीत. उच्चारणाचा वेग, शब्दांचा क्रमागत भेद आणि आवाजाची लयबद्ध फेक, यातच आहे. मंत्राचे सामर्थ्य. शब्दांच्या अर्थाला महत्व नसलेल्या मंत्राच्या स्वरुपावर भास्करराव नावाच्या आचार्यांनी टीका केली.

शब्दांचा अर्थ माहीत नाही किंवा शब्दांना अर्थच नाहीत तर त्यांचे उच्चारण काही फलदायी ठरणार नाही. राखेत अग्नी नसेल, तर आहुती टाकली. तर ती देवाला पोहोचणार कशी ? अर्थविना शब्द म्हणजे अग्नीविना राख.

शंकराचार्यांनी तंत्रमार्गात मंत्राचे महत्व फार मोठे आहे म्हणून सांगितले आहे. भक्तिमार्गात मंत्राने मुक्ती साधायची असते. ज्ञानबा तुकाराम किंवा निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई। एकनाथ नामदेव तुकाराम।। हा नामाचा गजर. त्या शब्दांच्या लयीला, नादाला सामर्थ्य आहे. दोन गारगोट्यांच्या चकमकीतून लख्ख वीज चमकावी तशी या शब्दांच्या आघातून भक्तीची ऊर्जा संचारते आणि चित्ताची एकाग्रता साधते. कौत्य नावाच्या ऋषीने नावाचा उच्चार नादमय झाला आणि त्याला लय लाभली, की तो मंत्र झालाच आणि त्याला सामर्थ्य आलेच, असे सांगितले आहे.

शब्द विशिष्ट क्रमाने येणे त्याला लय लाभणे, मग अर्थ नसला तरी नादाने गरजणे, मुक्ती देणारे देणे यालाच मंत्र म्हणणे, उच्चारणाची वेगवान गती करते शक्तिमान. ती करते चिंताला एकतात. मग मनाला फक्त त्या ईश्वराचे एकच भान. मनाला इतरत्रच्या उपभोगविषयाकडून ओढून आणायचे व ईश्वरचरणी एकाग्र करायचे सामर्थ्य मंत्रात असायचे आणि एकाग्रता साधणे हेही काय सहज घडते ? नाही. अर्जुनदेखील म्हणालाच, की या चित्ताचा निग्रह करण्यापेक्षा वाऱ्याची मोट बांधणे पुरवले.

मनाला विषयोपभोगापासून ओढून आणणे कठीण. एक वेळ आकाशाच्या चार घड्या घालता येतील. शून्याला पुढीत कोंबता येईल. प्रत्यक्ष यमाची नरडीही घोटता येईल, पण मनाला आवरणे जमणार नाही.

काही शब्दांत अर्थ नसला, तरी अभिनव असतो. अभिनयाचा परिणाम होतो. नामाच्या गजराला अभिनयाची साथ असते. अभिनयाने भावनिर्मिती होते. ती चित्ताची एकाग्रता साधायला साधनीभूत ठरते. परिणामी भक्त ईश्वररूपाशी वादात्म्ये पावतो. निर्थक, पण अभिनय व भावसंपन्न आणि म्हणूनच अत्यंत प्रभावपूर्ण असे शब्द काय अपूर्ण म्हणायचे? मराठीतल्या इरश या शब्दाला अर्थ नाही, पण अभिनय आहे. भाव आहे आणि त्याचा प्रभाव मोठा आहे.

**– किशोर गांधी**

# माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

## आध्यात्मिक विचारांतूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते : आ. संग्राम जगताप

नगर – माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. हा सप्ताह १२ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. उत्सव समितीच्यावतीने गेल्या २० वर्षांपासून माळीवाडा येथे या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.

यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे, संतांनी मनुष्याचे जीवन सत्कारणी लावण्यासाठी दिलेले विचार लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. संत सावता महाराजांनी आपल्या कार्यातून समाजोद्धाराचे महान कार्य केले आहे. आध्यात्मिक विचारांचा वारसा समाजामध्ये तयार झाला पाहिजे, यातूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते. आजच्या युवा पिढीने संत सावता महाराज यांचे विचार आत्मसात केले पाहिजे. या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांची सेवा उपलब्ध होत असल्याने चांगले धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. सप्ताहांतर्गत होत असलेले विविध सामाजिक उपक्रमातून समाजाला दिशा मिळत असल्याने असे धार्मिक कार्यक्रम नियमित होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आ. जगताप यांनी केले.



माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज, देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर, हभप विश्वनाथआण्णा राऊत, उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव आदी.

याप्रसंगी श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज, देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड अभय आगरकर, हभप विश्वनाथआण्णा राऊत, उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, पंडितराव खरपुडे, किशोर डागवाले, अविनाश घुले, दत्ता जाधव, दत्ता गाडळकर, महेंद्र पडोळे, डॉ. सुदर्शन गोरे, माणिकराव विधाते, मंगलताई लोखंडे, पुष्पाताई बोरुडे, सुरेखा कदम, हभप प्रभाताई भोंग, पुष्पा बोरुडे, बजरंग भुतारे, प्रा. संजय गारुडकर, अशोक कानडे, विष्णू फुलसौंदर, हभप बाळकृष्ण महाराज खेसे, जालिंदर महाराज निकम, कैलास खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, नितीन शेरकर, रमेश बनकर, हर्षल म्हस्के, अमोल धाडगे, विकास पटवेकर, विष्णूपंत म्हस्के, अनिल चेडे, बाळासाहेब रडे, अशोकराव कापरे, सुनिल पडोळे, भाऊसाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अशोकराव कानडे आदी उपस्थित होते.

उत्सव समितीप्रमुख छबूनाना जाधव म्हणाले, श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करुन समाजात धार्मिकता वाढावी. त्यातून समाजाची उन्नत्ती व्हावी. उत्सव समितीचे कार्यकर्ते तन–मन–धनाने यात सहभागी होत असल्याने सप्ताह यशस्वी होतो. १२ ऑगष्टपर्यंत चालणाऱ्या सप्ताहांतर्गत विविध किर्तनकारांची किर्तने होणार आहेत तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर, अभय आगरकर, पुष्पाताई बोरुडे आदींनी या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उत्सव समितीचे कौतुक केले. मंगलताई लेंडकर, उज्वला शेरकर, शैलजा मुळे, अभिषेक खंदारे, सागर जाधव, रमेश बनकर, कमलेश खरपुडे, समर्थ पुंड, मोहित चौधरी, विशाल उदावंत, अक्षय आंबेकर, अक्षय म्हस्के, तनय बोरुडे, उदय पटवेकर, संतोष मेहेत्रे, निखिल डागवाले, संतोष मोकाटे, वैभव आंबेकर, गौरव डागवाले, ऋषिकेश राऊत, मोहित ढवळे, गणेश राऊत, अनिल फुलसौंदर, जालिंदर बोरुडे आदींसह उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सूत्रसंचालन अभिषेक घटमाळ यांनी केले. आभार कैलास खरपुडे यांनी मानले. प्रारंभी कलश पुजन, प्रतिमा पुजन, ग्रंथपुजन, विणा पुजन, तुलसी पुजन आदींचे विधीवत पुजन करण्यात आले.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत चुरशीच्या लढती

## पोदार, आर्मी पब्लिक, श्री साई व कैसर स्कूलचा दमदार विजय

नगर – फिरोदिया शिवाजियन्स अ‍ॅकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ४ ऑगस्ट रोजी विविध वयोगटांतील सामने अत्यंत चुरशीचे आणि रंगतदार वातावरणात पार पडले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यांमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल, आर्मी पब्लिक स्कूल, श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि कैसर इंग्लिश मीडियम स्कूल यांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. तर मुलींच्या १६ वर्षांखालील गटातील सामना गोलशून्य बरोबरीत सुटला.

सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि ओएसीस इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यात सामना झाला. पोदार इंटरनॅशनल स्कूलकडून आयान अत्तार याने ११ व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर यशराज ठुबे याने २९ व्या मिनिटाला दुसरा गोल करत संघाची आघाडी भक्कम केली. उत्कृष्ट बचाव आणि प्रभावी आक्रमणाच्या जोरावर पोदार इंटरनॅशनल स्कूलने २–० अशा फरकाने विजय मिळवला. यानंतर १६ वर्षांखालील मुलांच्या गटातही पोदार इंटरनॅशनल स्कूलने ओएसीस इंग्लिश मिडीयम स्कूलवर २–० असा विजय मिळवत दुहेरी यश संपादन केले. या सामन्यात आर्यन साबळे याने दुसऱ्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला सुरुवातीपासूनच आघाडी मिळवून दिली. त्यानंतर त्याने ५० व्या मिनिटाला दुसरा गोल नोंदवत विजयावर शिक्कामोर्तब केले.

मुलींच्या १६ वर्षांखालील गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ण्ड एस यांच्यात अत्यंत चुरशीचा सामना झाला. दोन्ही संघांनी आक्रमक आणि



फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित फुटबॉल स्पर्धेत १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ऑण्ड एस यांच्यात रंगलेला सामना.

शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले. संपूर्ण सामन्यात अनेक संधी निर्माण झाल्या, मात्र दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. त्यामुळे हा सामना ०–० अशा गोलशून्य बरोबरीत संपला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ण्ड एस यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने एकतर्फी वर्चस्व राखले. आकाश चौहान याने दुसऱ्या हाफमध्ये ४० व ४७ व्या मिनिटाला प्रत्येकी एक गोल केला. अजय सांगळे याने ४३ व्या मिनिटाला एक गोल करत संघाच्या आघाडीत भर घातली. तर रुद्र कांबळे याने ४५ व ६० व्या मिनिटाला दोन गोल झळकावत संघाचा विजय निश्चित केला. आर्मी पब्लिक स्कूलने ५–० अशा मोठ्या फरकाने विजय मिळवत प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करू दिला नाही.

दुपारच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ऑण्ड एस यांच्यात पुन्हा एकदा रोमांचक सामना रंगला. पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांनी अनेक आक्रमणे केली, मात्र गोल करण्यात अपयश आले. अखेर प्रतिक शेळके याने ३१ व्या मिनिटाला निर्णायक गोल करत आर्मी पब्लिक स्कूलला आघाडी मिळवून दिली. हा गोल अखेरपर्यंत कायम राखत आर्मी पब्लिक स्कूलने १–० अशा फरकाने विजय मिळवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि कर्नल परब स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने आक्रमक खेळ करत ४–० अशा फरकाने एकहाती विजय मिळवला. साईदीप भगत याने ४ व्या मिनिटाला पहिला गोल करून संघाचे खाते उघडले आणि २४ व्या मिनिटाला दुसरा गोल नोंदवला. अर्श शेख याने २१ व्या मिनिटाला तर आर्या शिंदे याने ३८ व्या मिनिटाला गोल करत विजय अधिक दिमाखदार केला. कर्नल परब स्कूलला मात्र एकही गोल करता आला नाही.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि कैसर इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यातही अत्यंत चुरशीचा सामना झाला. कैसर इंग्लिश मीडियम स्कूलकडून समर्थ शिंदे याने २८ व्या मिनिटाला पहिला गोल केला. त्यानंतर श्री लगड याने ४६ व्या मिनिटाला दुसरा गोल करत संघाचा विजय निश्चित केला. कैसर इंग्लिश मीडियम स्कूलने २–० अशा फरकाने श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचा पराभव करत स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले.

# शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन तातडीने जाहीर करण्यात यावे

## अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाची मागणी



सचिन झगडे

नगर – राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धा दरवर्षी जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या नियोजन प्रक्रियेनुसार आयोजित केल्या जातात. मात्र यंदा ऑगस्ट महिना सुरू होऊनही खेळाडू नोंदणी, स्पर्धांचे वेळापत्रक आणि आयोजनाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने माध्यमिक शाळांतील क्रीडा शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या पोर्टलद्वारे खेळाडूंची नोंदणी आणि स्पर्धांचे नियोजन केले जात होते. यंदा ही प्रक्रिया स्पोर्टस महाराष्ट्र विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र संबंधित संकेतस्थळ अद्याप कार्यान्वित नसल्यामुळे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली नाही.

नवीन प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थी खेळाडूसाठी पहिलीच्या जनरल रजिस्टरची प्रत, जन्मदाखला आणि आधार कार्ड ही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी खेळाडू असल्याने एवढ्या कमी कालावधीत सर्व कागदपत्रे संकलित करून स्कॅन करणे व ऑनलाइन अपलोड करणे हे अत्यंत जिकिरीचे आणि अशक्यप्राय काम ठरणार आहे.

स्पर्धांचे वेळापत्रक अचानक जाहीर झाल्यास शिक्षकांवर अतिरिक्त प्रशासकीय ताण येईल, तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने संकेतस्थळ सुरू करून खेळाडू नोंदणीसाठी पुरेसा कालावधी द्यावा, तसेच जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांचे वेळापत्रक आगाऊ जाहीर करावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने केली आहे.

शालेय क्रीडा स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मात्र स्पर्धांचे नियोजन विलंबाने होत असल्याने विद्यार्थी आणि क्रीडा शिक्षक दोघेही संभ्रमात आहेत. एका विद्यार्थ्यासाठी तीन कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची प्रक्रिया वेळखाऊ आहे. अनेक शाळांमध्ये शेकडो खेळाडू असल्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक आहे. शासनाने तातडीने वेबसाइट सुरू करून स्पष्ट वेळापत्रक जाहीर करावे, अन्यथा विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची भीती अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी व्यक्त केली आहे.

# ग्राहक पंचायतचे ८ व ९ ऑगस्टला वडगाव मावळ येथे राज्य अधिवेशन

## राज्यभरातील पाचशेच्यावर साधकांची राहणार उपस्थिती

नगर – ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे संस्थापक ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी यांच्या पवित्र स्मृतीला स्मरून ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेचे दोन दिवसीय भव्य राज्य अधिवेशन व राज्यस्तरीय अभ्यासवर्ग येत्या ८ व ९ ऑगस्ट रोजी मुंबई–पुणे महामार्गावरीलवडगाव मावळ येथे आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती राज्य अध्यक्ष विजय लाड यांनी दिली.

या अधिवेशनाच्या आयोजनानिमित्त आयोजित ऑनलाइन बैठकीत त्यांनी अहिल्यानगर येथील साधकांशी संवाद साधला तेव्हा ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, ग्राहक देवो भव हे ब्रीद साकारून वग्राहक हा राजाच आहे हे या दृढ विश्वासावर हा राज्यस्तरीय अभ्यास वर्ग आयोजित केला आहे. या राज्य अधिवेशनासाठी राज्यभरातील ५०० हून अधिक ग्राहक पदाधिकारी, साधक सहभागी होणार आहेत.

या दोन दिवसीय राज्य अधिवेशनाचे उद्घाटन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती सुरेंद्र तावडे यांच्या हस्ते होणार आहे. या अधिवेशनात विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून आमदार सुनिल शेळके, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, माजी सहकार मंत्री आमदार सुभाष देशमुख, माजी अर्थमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार, महावितरणचे मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार, उद्योजक कॅप्टन विलासराव कात्रे या सर्वांची उपस्थिती व विशेष मार्गदर्शन व लाभणार आहे.

या अगोदरही राज्यातील विविध विभागात राज्यस्तरीय अधिवेशने झाल्याने साधक पदाधिकाऱ्यांना मोठी ऊर्जा मिळाली आहेच.

या ऑनलाईन बैठकीला जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा संघटक प्रा. राजेंद्र कळमकर, जिल्हा सचिव अ‍ॅड.सिद्धार्थ वाघमारे, सहसचिव संजय जोशी, जिल्हा कोष प्रमुख कृष्णराव बागडे सदस्य सौ.संज्योत रसाळ सौ.आशा सातपुते, संजीव परशुरामी, रवी सातपुते, सर्वोत्तम क्षीरसागर उपस्थित होते.

# लक्ष्मी यात्रा उत्सवाची पोतराजासह शहरात रंगली मिरवणूक

नगर – आषाढ महिन्या–निमित्त शहरातील काटवण खंडोबा रोड येथील गाडळकर मळा परिसरात पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पारंपरिक लक्ष्मीआई यात्रा उत्सव यंदाही मोठ्या भक्तिभाव आणि उत्साहात साजरा करण्यात आला. भंडाऱ्याची उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर, पोतराजांचा सहभाग आणि लक्ष्मीआईच्या नावानं चांगभलंच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.



लक्ष्मीआई यात्रा उत्सवानिमित्त शहरात निघालेल्या मिरवणुकीत पोतराजांनी लक्ष वेधून घेतले.

यात्रेच्या मिरवणुकीचा शुभारंभ पाचारणे कुटुंबीयांच्या हस्ते व गुरुवर्य रमाई यांच्या आशीर्वादाने नारळ वाढवून करण्यात आला. यानंतर घोड्यांच्या आकर्षक बग्गीत विराजमान असलेल्या लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि पोतराजांच्या उपस्थितीत निघालेल्या या मिरवणुकीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

मिरवणुकीत भाविकांनी भंडाऱ्याची उधळण करत लक्ष्मीमातेचा जयघोष केला. भक्तीमय वातावरणात युवकांनी भक्तिगीतांच्या तालावर ठेका धरत उत्सवाचा आनंद लुटला. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

ही शोभायात्रा काटवण खंडोबा रोड, आयुर्वेद कॉलेज चौक, वाडिया पार्क, माळीवाडा मार्गे माळीवाडा येथील लक्ष्मीमाता मंदिरात पोहोचली. मंदिरात धार्मिक विधी व आरतीनंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

यावेळी मिरवणुकीत हिराबाई रमेश पाचारणे, विकास पाचारणे, कविता पाचारणे, आलका पाचारणे, कुणाल पाचारणे, उज्वला खंडागळे, अंजली कापसे, राजू पाचारणे आदींसह युवक, महिला व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या लक्ष्मीआई यात्रेला सुमारे २० ते ३० वर्षांची परंपरा लाभली आहे. धार्मिक परंपरा, लोकसंस्कृती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा हा यात्रा उत्सव परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरतो.

दरम्यान, यात्रेच्या आदल्या दिवशी पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला होता.

# व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे यावे

## सभापती प्रा.राम शिंदे यांचे आवाहन; अहिल्यानगरमध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान

नगर– आजचा तरुण हा देशाच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार आहे. तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनाच्या आहारी जाऊ नये, तसेच व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या व्यक्तींना त्यापासून परावृत्त करून व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी केले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात जनजागृतीला चालना दिली जात असल्याचे सांगितले. तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आपले भविष्य घडवावे, असे आवाहन करत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने राबविलेल्या या जनजागृती अभियानाचे त्यांनी कौतुक केले.



जिल्हा पोलिस दलातर्फे आयोजित अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानाच्या शुभारंभप्रसंगी सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे आदी.

अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलातर्फे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. 'एक निर्धार, एक संकल्प, एक भविष्य' व्यसनमुक्ती जिल्ह्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल या संकल्पनेवर आधारित या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने शहरात व्यसनमुक्त रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी शहरातील अनेक शाळा, महाविद्यालयांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

सभापती प्रा शिंदे म्हणाले की, तरुणांची ऊर्जा, बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व हे राष्ट्राच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. मात्र अंमली पदार्थ आणि व्यसनांच्या वाढत्या विळख्यामुळे अनेक तरुणांचे शिक्षण, करिअर, आरोग्य आणि कुटुंबीयांचे सुख धोक्यात येत आहे.अहिल्यानगरचे भविष्य उज्ज्वल राहिले तरच राज्याचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. तरुणांनी देखील या अभियानाचा भाग होऊन चुकीच्या गोष्टी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध माहिती देऊन पोलिसांना सहकार्य करावे. तरुणांनी व्यसनाच्या नाही तर स्वप्नांना होकार देण्याचे आवाहन विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी यावेळी केले.

पालकमंत्री डॉ विखे पाटील म्हणाले की, अंमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीचे आरोग्य बिघडवत नाही, तर त्याच्या कुटुंबावर, समाजावर आणि देशाच्या प्रगतीवरही विपरीत परिणाम करते. व्यसनामुळे मानसिक ताण, आर्थिक नुकसान, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि सामाजिक विघटनाला चालना मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक तरुणाने व्यसनापासून दूर राहून शिक्षण, कौशल्य विकास, क्रीडा, कला, उद्योग आणि समाजसेवा यांसारख्या सकारात्मक क्षेत्रांमध्ये स्वतःला घडविण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले. आमदार विक्रम पाचपुते म्हणाले की, पोलिस अधीक्षक कार्यालयातर्फे या अभियानाचे खूप चांगल्या प्रकारे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानामुळे नागरिकांमध्ये व्यसनमुक्ती बाबत जनजागृती निर्माण होणार आहे. तरुणांनी देखील व्यसनाकडे न वळता भविष्याकडे लक्ष द्यावे असेही ते म्हणाले.

आमदार श्री दाते म्हणाले की, व्यसन हे आपल्या समाजाला लागलेली किड आहे. आपल्या देशातील तरुणांनी व्यसनाकडे वळू नये. आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने तरुणांनी मार्गक्रमण करावे. तरुणांनी व्यसनमुक्तीच्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. प्रास्ताविकात पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन म्हणाले की, व्यसनमुक्त समाजासाठी आजच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरुण आपल्या देशाचे भविष्य आहे. आपले भविष्य नशामुक्त राहणे गरजेचे आहे. ' नशामुक्त भारताचे' स्वप्न आपल्याला पूर्ण करायचे आहे असेही ते म्हणाले. तरुणांनी समाज माध्यमाचा उपयोग केवळ आपल्या विकासासाठी करावा. समाज माध्यम हाताळताना देखील खबरदारी घ्यावी असेही ते म्हणाले.

या अभियानांतर्गत शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत विद्यार्थी, युवक, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# विखे पाटील फाउंडेशनच्या स्वायत्त आयबीएमआरडीला विद्यार्थ्यांची पहिली पसंती

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट (आयबीएमआरडी) मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून स्वायत्त शिक्षण प्रणालीची अंमलबजावणी होत आहे. या पार्श्वभूमीवर एमबीए, बीबीए, बीसीए आणि एमसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच फेरीत विद्यार्थी व पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी संस्थेला पसंती दिली आहे.

स्वायत्त शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना एनईपी २०२० आणि एआयसीटीई मार्गदर्शक तत्त्वांनुसार उद्योगाभिमुख, कौशल्याधारित शिक्षण, अद्ययावत अभ्यासक्रम, इंटर्नशिप, प्रकल्पाधारित शिक्षण तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली संस्थेची बांधिलकी यामुळे विद्यार्थी व पालकांचा वाढता विश्वास प्रवेश प्रक्रियेत स्पष्टपणे दिसून येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून सुरू होत असलेल्या स्वायत्त शिक्षण व्यवस्थेचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करावी.

एमबीए, बीबीए, बीसीए आणि एमसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू असून, इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रवेशासाठी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी केले आहे.


फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल स्पर्धेमध्ये गोल होऊ नये म्हणून संरक्षण करताना ऑर्किड शाळेचा खेळाडू साहिल मुन्शी.

# आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत साहिल मुन्शीची चमकदार कामगिरी

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स केडमी आयोजित आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ऑर्किड हायस्कूल आणि तक्षशिला शाळेत अत्यंत चुरशी चा सामना झाला.

या सामन्यात दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी फुटबॉल खेळाचे अत्यंत उत्कृष्ट प्रदर्शन केले. या मध्ये ऑर्किड शाळेचा विद्यार्थी साहिल मुन्शी हा डिफेन्समध्ये चमकला. त्याने तक्षशिला या शाळेचे गोलकरीता होणारे हल्ले परतऊन लावले. परंतु शेवटी तक्षशिला शाळेने दोन विरुद्ध शुन्य या गोलने आर्किड शाळेचा पराभव केला.

या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण होऊन प्रेक्षकांना सूद्धा खेळाचा आनंद घेता आला. या स्पर्धेच्या आयोजकांनी अत्यंत उत्कृष्ट असे नियोजन केले होते.

# एमआयडीसीचा ६४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव; गंध मराठी मातीचा हा सांगीतिक कार्यक्रमात श्रोते मंत्रमुग्ध

नगर – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) च्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त एमआयडीसी प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, गंध मराठी मातीचा हा सांगीतिक कार्यक्रम तसेच प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांचे व्याख्यान अशा विविध उपक्रम राबवून हा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.


एमआयडीसीच्या वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले.

औद्योगिक विकासाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत रक्तदान, शिक्षण, पर्यावरण, आरोग्य आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य सातत्याने राबविणासाठी एमआयडीसी प्रशासनाने कृष्णाली व कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशनच्या सहकार्याने हे उपक्रम राबविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. गंध मराठी मातीचा या सांगीतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानातून मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि सामाजिक मूल्यांवर मार्गदर्शन करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड यांनी एमआयडीसीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या औद्योगिक प्रगतीचा आढावा घेत राज्याच्या विकासातील महामंडळाच्या योगदानावर प्रकाश टाकला. औद्योगिक विकासासोबत समाजाप्रती असलेली जबाबदारीही महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या शिबिरासाठी जनकल्याण रक्तकेंद्र, अहिल्यानगर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, डॉ. प्रसाद इटकर, विलास मढीकर, शरद बळे, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा जोशी, सुलभा पवळ, तेजल हांडे तसेच वाहनचालक खुशाल खरमाळे यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी विशेष योगदान दिले.

याच कार्यक्रमात विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपअभियंता सरदार अनुसे, संदीप बडगे, कृष्णाली व कृष्णप्रीत वेल्फेअर फाउंडेशनचे संचालक प्रशांत शेळके, राहुल बळी, प्रवीण टेकाळे (क्षेत्र व्यवस्थापक), प्रदीप शिरसाठ, अमित गायकवाड, सेवानिवृत्त पांडुळे तसेच एमआयडीसीचे अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी डोंगरे व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचालन प्रियंका शेळके यांनी केले.

# अशोक गायकवाड यांच्या निधनामुळे ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा स्थगित

नगर – अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात ९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा आंबेडकरी चळवळीतील झुंजार, अभ्यासू व संघर्षशील नेतृत्व अशोक गायकवाड यांच्या आकस्मिक निधनामुळे स्थगित करण्यात आला आहे. समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय एकमुखाने घेण्यात आला.


आंबेडकरी समाजाच्या अनुयायांच्या बैठकीत बोलताना सुरेश बनसोडे.

बैठकीत ठरविण्यात आले की, ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता अशोक गायकवाड यांच्या निवासस्थानी जलदान विधी पार पडणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता नगर–मनमाड रस्त्यावरील वृंदावन लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या शोकसभेला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्यासह राज्यातील विविध नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार, खासदार, महानगरपालिका आयुक्त, सर्व नगरसेवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि समाजबांधवांना उपस्थित राहून अशोक गायकवाड यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रश्नावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात नियोजित मोर्चा पुढील महिन्यात अधिक व्यापक, संघटित आणि तीव्र स्वरूपात काढण्याचा निर्धार करण्यात आला. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत संविधान, सामाजिक न्याय आणि समतेच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

बैठकीस नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील साळवे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, सुरेंद्र थोरात, सुनील क्षेत्रे, अजय साळवे, परिमल निकम, हर्षल गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, एन एम पवळे, निवृत्ती आरू, विजयराव भांबळ, महेश भोसले, मृणाल भिंगारदिवे, विलास साठे, प्रा. एल. बी. जाधव, सिद्धार्थ आढाव, अमित काळे, शनेश्वर पवार, दया गजभिये, महेंद्र राजगुरू, विजय गायकवाड, भाऊ भिंगारदिवे, विशाल कांबळे, विशाल गायकवाड, आप्पासाहेब मकासरे, विशाल भिंगारदिवे, प्रा भिमराव पगारे, कौशल गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, जयश्री गायकवाड, किरण गायकवाड, अविनाश भोसले, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, पवन भिंगारदिवे, मयूर पाखरे, अजिंक्य भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, प्रताप भिंगारदिवे, अजय पाखरे, सुरेश भिंगारदिवे, सिद्धार्थ भिंगारदिवे, रवी कांबळे, आकाश तांबे, अक्षय गायकवाड, सिद्धार्थ पवार, संदीप वाकचौर आदीसह यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यापूर्वी नियोजित मोर्चात जिल्हाभरातील समस्त आंबेडकरी समाज, विविध सामाजिक संघटना, शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार होते. मात्र, अशोक गायकवाड यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर मोर्चा पुढे ढकलण्यात आला असून तो पुढील महिन्यात अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

स्व. गायकवाड यांच्या कार्यावर आधारित डॉक्युमेंट्री करण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांच्या आंदोलनातील फोटो नगरसेवक सुरेश बनसोडे व सुमेध गायकवाड यांच्याकडे जमा करावे, असे आवाहनही या बैठकीत करण्यात आले.


लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी शहर भाजपच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते. यावेळी उपस्थित पदाधिकारी.

# लोकमान्य टिळकांचे कार्य, विचार आजही सर्वांना प्रेरणादायी

## भाजपा शहराध्यक्ष अनिल मोहिते यांचे प्रतिपादन; शहर भाजपाच्या वतीने लोकमान्य टिळकांना अभिवादन

नगर – 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे...' ही देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला कलाटणी देणारी सिंहगर्जना लोकमान्य टिळकांनी नगरमध्ये केल्याचा अभिमान सर्व नगरकरांनी आहे. ज्या ठिकाणी ही सिंहगर्जना झाली त्याच ठिकाणी लोकमान्यांना अभिवादन करताना मोठा अभिमान वाटत आहे. लोकमान्य टिळकांचे कार्य, विचार आजही सर्वांना प्रेरणादायी व स्फूर्तिदायक आहेत, असे प्रतिपादन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी–निमित्ताने शहरातील इमारत कंपनी येथील त्यांच्या पुतळ्यास शहर भाजपाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अनिल मोहिते बोलत होते. यावेळी सरचिटणीस अशोक गायकवाड, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे, युवा मोर्चाचे अध्यक्ष रुद्रेश अंबाडे, नगरसेवक रवींद्र बारस्कर, संजय गायकवाड, उदय अनभुले, लक्ष्मीकांत तिवारी, देवेंद्र दुधाले, देवेंद्र बंब, राहुल जामगावकर, ज्ञानेश्वर धिरडे, श्रीकांत फंड, सुनील सकट आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धा



नगर – श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त १८ ऑगस्ट हा दिवस राज्यभर 'पराक्रम दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. नवीन पिढीला त्यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व राष्ट्रनिष्ठेचा परिचय व्हावा, या उद्देशाने अमृत संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने सुरु झाल्या असून स्पर्धकांना १५ ऑगस्ट पर्यंत याध्ये भाग घेता येणार आहे.

शाळा, महाविद्यालये तसेच खुल्या गटातील जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे; अठराव्या शतकातील हिंदवी साम्राज्य विस्तारक थोरले बाजीराव पेशवे, अपराजित योद्धा थोरले बाजीराव पेशवे, त्यांचे संघटन कौशल्य, युद्धनीती व स्वामीनिष्ठा, दिल्ली मोहीम, बुंडेलखंड व छत्रसालाचे रक्षणकर्ते तसेच त्यांचा जगप्रसिद्ध पालखेड विजय हे विषय देण्यात आले आहेत.

प्रत्येक विषयातील व गटातील विजेत्यांना रोख स्वरातील आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, अहिल्यानगर येथे ९११२२२८७६९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समन्वयक सागर भोपे यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# चीनचे लि सन यांच्या हस्ते मांजरसुंबा येथे वृक्षारोपण

## २७० प्रकारच्या झाडांची लागवड, जीकेन कंपनीने घेतली संवर्धनाची जबाबदारी

नगर – नगर एमआयडीसीतील जीकेन सिंटर मेटल्स कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथे वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी चीनमधून जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन यांनी विशेष उपस्थिती लावली. गावातील विकासकामे, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, शिक्षण आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागाची पाहणी करून मांजरसुंबा गावाचे कौतुक केले.


मांजरसुंबा येथे वृक्षारोपण करताना जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि सन. समवेत कंपनीचे अधिकारी व ग्रामस्थ.

लि–सन म्हणाले, मांजरसुंबा गावात पर्यावरण संरक्षणासाठी होत असलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. या गावातील पर्यावरण संवर्धनाची बरोबरी चीनमधील अनेक प्रगत भागांशी करता येईल. येथे जाणवणारी सकारात्मक ऊर्जा चीनमधील काही विकसित गावांची आठवण करून देते. भारतात आल्यानंतर नेहमीच आनंद वाटतो. हिमालय पर्वतरांगांमुळे भारत आणि चीन यांच्यातील भौगोलिक अंतर मोठे असले तरी दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये अधिक सांस्कृतिक आणि सामाजिक संवाद वाढला पाहिजे. हा संपर्क केवळ राजकीय पातळीवर न राहता सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. गावातील महिलांचा सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग विशेष कौतुकास्पद असून जीकेन कंपनी केवळ उद्योग व्यवसायापुरती मर्यादित नसून समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्येही सातत्याने कार्यरत आहे. मांजरसुंबा गावाला भेट देऊन मनस्वी आनंद झाला असून पुन्हा या गावाला भेट देण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन, डायरेक्टर – इंडिया ऑपरेशन्स राजेश मीराणी, सरपंच रूपाली कदम, उपसरपंच जालिंदर कदम, डायरेक्टर – फायनान्स इंडिया सचिन असोले, डायरेक्टर – सेल्स सिद्धार्थ मित्रा, जनरल मॅनेजर सुधीर पोळ, प्लांट डायरेक्टर पुरुषोत्तम रिशी, डॉ. अभिजीत कुलकर्णी, सुनील राठी, बबन हिंगे, सिद्धार्थ भोसले, विठ्ठल हंडोरे, रमेश म्हस्के, मनोज गोरे, मिलिंद जपे, सोमनाथ ठोंबरे, ग्रामसेविका सारिका वाळुंज, विलास भुतकर, इंद्रभान कदम, चंद्रभान कदम, बाळासाहेब कदम, अक्षय कदम, गर्भगिरी शेतकरी महिला गट, शिव महिला गट तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

राजेश मीराणी म्हणाले, जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन यांनी मांजरसुंबा गावाला भेट देऊन येथील विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. शिक्षण, शेती, जलसंधारण आणि पर्यावरण संरक्षण क्षेत्रात गावाने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. जीकेन कंपनी रोजगार निर्मितीबरोबरच समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक उपक्रम राबवत आहे. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी या गावात झाली असून श्री गोरक्षनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीच्या विकासासाठी कंपनीचे सहकार्य कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

पर्यावरण व सुरक्षा अधिकारी बबन हिंगे यांनी सांगितले की, जीकेन कंपनीच्या वतीने मांजरसुंबा गावात २७० विविध प्रकारची झाडे लावण्यात आली असून त्यासाठी सिंचन व्यवस्था आणि संरक्षणासाठी सुरक्षा कुंपणही उभारण्यात आले आहे. वड, पिंपळ, कदंब, बकुळ, नीलमोहर, गुलमोहर, अर्जुन, तबेबिया, बूच, रबर यांसारख्या विविध प्रजातींची वृक्षलागवड करण्यात आली असून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारीही कंपनीने स्वीकारली आहे.

सरपंच रूपाली कदम आभार मानले.

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी खा. नीलेश लंके आक्रमक

**सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी केंद्रीय मंत्र्यांना दिला महत्वाचा प्रस्ताव**

नगर – अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, कौशल्य विकास आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी पंतप्रधान जन विकास कार्यक्रम अंतर्गत विविध विकासकामांना तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये विविध विकास योजनांसाठी निधी द्यावा या मागणीचा प्रस्ताव केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांना देताना खा. नीलेश लंके.

खासदार लंके यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा मतदारसंघातील अनेक अल्पसंख्याक बहुल वस्त्या आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर आहेत. या भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी, सामुदायिक सुविधा आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण केंद्रांचा अभाव असल्याने नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर, युवकांच्या रोजगाराच्या संधींवर आणि महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणावर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

पीएमजेव्हीके ही केंद्र सरकारची महत्त्वाची योजना असून अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी ही योजना प्रभावी माध्यम ठरू शकते. त्यामुळे या योजनेअंतर्गत मतदारसंघातील प्राधान्याच्या विकासकामांचा समावेश करून त्यांना तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

निवेदनामध्ये शाळांच्या नवीन इमारती, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृहे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, कौशल्य विकास केंद्रे, सामुदायिक भवन, अंगणवाडी केंद्रे, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, गटारे आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. या सुविधा उभारल्यास नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास केंद्रांना विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचेही खासदार लंके यांनी अधोरेखित केले आहे. उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास अल्पसंख्याक समाजातील युवक-युवती स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करू शकतील, असे त्यांनी नमूद केले आहे.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भक्कम पायाभूत सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अल्पसंख्याक समाजाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून सामाजिक समावेशन, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा समन्वय साधणे गरजेचे असल्याचे खासदार लंके यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करून पीएमजेव्हीके योजनेंतर्गत आवश्यक निधी तातडीने मंजूर केल्यास अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांच्या विकासाला मोठी चालना मिळेल. तसेच हजारो नागरिकांना शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या जीवनमानात गुणात्मक सुधारणा होईल, अशी अपेक्षा खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली आहे.

## गुरुवाणी – ११

### भक्तीची अनुभूती हे वरदान



भगवान मंदिरात नाही तर भक्तांच्या हृदयात विराजमान असतात. म्हणूनच म्हणतात, 'भगवंत शोधायचा तर भक्त शोधा'. महाराष्ट्रातील वारकरी परंपरेत कीर्तन सुरू होण्याआधी विणा वादक भजन करतो. कीर्तनकार आल्यावर प्रथम वीणावादकाला नमस्कार करतो मग कीर्तन सुरू करतो. आपण सगळे भाग्यशाली आहोत की आपल्या प्रत्येकाच्या हृदयात गुरूदेव आहेत. चंडकौशिक या अतिशय विषारी सर्पाच्या आसपास कोणी भीतीने फिरकत नव्हते. सगळेच त्याला दूषणे द्यायचे. पण तीर्थंकर भगवान यांची नजर पडताच चंडकौशिक बदलला. त्याच्या हृदयात तीर्थंकर विराजमान झाले. नंतर लोक त्याची पूजा करायला लागले, त्याला दूध अर्पण करू लागले. त्याने आपले तोंड कायमचे बिळात ठेवले व परमात्म्याची भक्ती करू लागला. दूधामुळे मुंग्या जमा झाल्या. त्याला मुंग्या चावू लागल्या पण त्याने आपली जागा सोडली नाही. पंचेंद्रीय जीव दुःख, वेदना असेल तिथून पलायन करतो. चंडकौशिकला फक्त तीर्थंकर परमात्माची अनुभूती येत असल्याने तो वेदना असूनही आपली जागा सोडत नाही. देशभरात जिथे जिथे आनंदगाथा झाली तिथे अनेकांनी खंत व्यक्त केली की, गुरूदेवांचे प्रत्यक्ष दर्शन मिळाले नाही. नगरकर भाग्यवान आहेत, त्यांना गुरूदेवांच्या पावन भूमीचे सान्निध्य लाभले आहे. गुरूदेवांच्या जन्मोत्सवानिमित्त मुंबई, नागपूर, जयपूर अशा विविध ठिकाणांहून भक्त गुरूदेवांच्या भूमीत अट्ठाई करण्याच्या भावनेने आले. फास्ट फूड आवडणारी लहान मुलेही अट्ठाई करत आहेत. याला कारण त्यांच्या घरातील भक्तीचा माहोल आहे. त्यांच्या परिवारावर गुरूकृपाच झाली आहे. जैन धर्म शास्त्रानुसार भगवंतांचा जन्म होत नाही. भगवंत बनण्याची ऊर्जा, ज्ञान मुलाला आई वडिलांकडून मिळते. माता हुलसा यांनी गुरूदेवांना सुरूवातीलाच तीर्थंकरांचा मार्ग दाखविला. जिन शासनात आठ वर्षे पूर्ण होईपर्यंत दीक्षा दिली जात नाही. तसेच वय वर्ष ६० नंतर दीक्षा दिली जात नाही. कारण योग्य वेळी विरजन लावले तरच दूधापासून दही बनते. ती वेळ महत्त्वाची असते. चंडकौशिकच्या शरीराला मुंग्या चावत होत्या पण मनात फक्त परमात्मा होता. म्हणूनच भक्तीत कर्म, पुरूषार्थ चालत नाही, फक्त भक्तीच चालते. यामुळेच गुरूदेवांचा जन्मोत्सव भक्तांसाठी संवत्सर आहे. गुरूभक्तीचे वरदान आयुष्य बदलवून टाकते. भक्तीची अनुभूती होणे हे आयुष्यातील खूप मोठे वरदान आहे. जेव्हा मनात श्रेष्ठ भक्ती निर्माण होते तेव्हा मोक्ष गतीकडे वाटचाल सुरू होते.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# आईएमएस सीडसीतर्फे ८ व ९ ऑगस्टला 'रक्षाबंधन स्पेशल महिला उद्योजिका प्रदर्शन'

नगर – बीपीएचई सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च अंतर्गत कार्यरत स्किल एन्हान्समेंट ॲण्ड आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट सेंटर यांच्या वतीने 'रक्षाबंधन स्पेशल महिला उद्योजिका प्रदर्शनचे आयोजन ८ व ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत आम्रपाली मंगल कार्यालय, परिजात चौकाजवळ, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

रक्षाबंधन व आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर महिलांना एकाच ठिकाणी दर्जेदार व आकर्षक वस्तू खरेदीची संधी या प्रदर्शनातून उपलब्ध होणार आहे. प्रदर्शनामध्ये फॅशन, कॉस्मेटिक्स, ज्वेलरी, होम डेकोर, वेस्टर्न आऊटफिट्स, हेल्थ केअर उत्पादने, ब्युटी प्रॉडक्ट्स, मुलांचे कपडे व ॲक्सेसरीज तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स ग्राहकांसाठी उपलब्ध असतील. महिला उद्योजिकांना त्यांच्या उत्पादनांसाठी प्रभावी विपणन व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. प्रदर्शनासाठी मर्यादित स्टॉल्स उपलब्ध असून इच्छुक महिला उद्योजिकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. ऋचा तांदुळवाडकर (९८५०३७०१४१) किंवा प्रा. गौरी पाटील (८२०८७५२९३०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आय एम एस सीडीसी तर्फे करण्यात आले आहे.

# 'कोहिनूर मॉल'मध्ये केदारनाथ मंदिराची प्रतिकृती; ८ ऑगस्ट रोजी होणार उद्घाटन

नगर – व्रत वैकल्याच्या श्रावण महिन्यात शिव पूजनाला महत्त्व आहे. या पावन महिन्या निमित्ताने कोहिनूर मॉलमध्ये उत्तराखंड येथील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या केदारनाथ मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. या सुंदर व भव्य प्रतिकृतीचे उद्घाटन ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार, आमदार संग्राम जगताप आणि उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कोहिनूर मॉलच्या वतीने राबविण्यात आलेला हा अनोखा आणि आध्यात्मिक उपक्रम नागरिकांसाठी एक विशेष आकर्षण ठरणार आहे. 'केदारनाथ मंदिर आता अहिल्यानगरमध्ये' या संकल्पनेतून उभारण्यात आलेली ही सुंदर प्रतिकृती ८ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर दरम्यान दररोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत दर्शनासाठी खुली राहणार आहे. विशेष म्हणजे हा उपक्रम सर्वांसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे. या संपूर्ण कालावधीत मंदिरात सायंकाळी ६.१५ वाजता सामूहिक महाआरती होणार आहे.



केदारनाथ मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार आणि गर्भगृह असलेली ही प्रतिकृती सुमारे ४०० स्क्वेअर फूट असून जमिनीपासून कळसाची उंची २५ फूट असणार आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर भाविकांना केदारनाथ शिवलिंगाचे दर्शन घेता येईल. मंदिराचा कळस पूर्ण फॅब्रिकेट बॉक्स टाईप असून मध्यभागी छोट्या देवघरामध्ये सिंहाची प्रतिकृती असेल. मंदिरावर त्रिकोणी मनोऱ्यावर तीन फुटी सोनेरी रंगाचा कळस असेल. सर्वात वर केसरी झेंडा फडकावला जाईल. मुख्य प्रवेशद्वारासमोर नंदीची मूर्ती असेल. तसेच सोनेरी त्रिशूल व डमरूची सजावट असेल. हुबेहुब दिसणारी अशी ही प्रतिकृती भाविकांना थेट केदारनाथला भेट दिल्याची अनुभूती देईल. याचबरोबर, ८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत प्रख्यात कलाकार प्रकाश बोरुडे यांच्या १२ ज्योतिर्लिंगांवरील चित्रप्रदर्शनाचे आयोजन कोहिनूर मॉल येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून भाविकांना भारतीय अध्यात्माची ओळख तर होईलच, शिवाय एआय व्हिडिओच्या माध्यमातून १२ ज्योतिर्लिंगांची सखोल माहितीही अनुभवता येणार आहे. या माध्यमातून लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांना एकाच ठिकाणी केदारनाथ दर्शन, ज्योतिर्लिंगांची माहिती आणि सांस्कृतिक अनुभव घेता येणार आहे.

कोहिनूर मॉलच्या संचालिका श्वेता गांधी यांनी सांगितले की, पवित्र श्रावण महिन्यात भक्तीमय वातावरण असते. भक्ती आणि श्रद्धेच्या या संगमात भाविकांसाठी दिव्य अनुभूती देणारा उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. सर्व नागरिकांनी कुटुंबासह येथे येऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा.

केदारनाथ मंदिराच्या भव्य दिव्य प्रतिकृती निमित्ताने नगरमधील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. शाळांनी वेळ घेऊन विद्यार्थ्यांची छोटेखानी सहल कोहिनूर मॉल येथे आणावी. यातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, अध्यात्म, धार्मिक इतिहास, १२ ज्योतिर्लिंगांची एआय निर्मित ऑडिओ व्हिडिओ स्टोरी पहायला मिळेल. यासह प्रख्यात कलाकार प्रकाश बोरुडे यांच्या १२ ज्योतिर्लिंगांवरील चित्र प्रदर्शनाही पाहता येईल. ८ ते ३० ऑगस्ट दरम्यान शाळांना ही विद्यार्थी सहल आयोजित करता येईल.

कोहिनूर मॉल येथे श्रावणानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी २३ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ६ यावेळेत भव्य चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. यात विद्यार्थ्यांनी भगवान शंकराचे चित्र काढायचे आहे. तसेच ६ सप्टेंबर रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत कोहिनूर मॉल येथेच श्रावण स्पेशल फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस दिले जाईल. स्पर्धेसाठी नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ९३०९७३९९२८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

कोहिनूर मॉलने ग्राहकांना नेहमीच सर्वोत्तम खरेदीचा आनंद दिला आहे. यासोबतच संस्कृती संवर्धन आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. या उपक्रमातूनही त्याच परंपरेला पुढे नेण्यात येत आहे. नगरकरांनी ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ३ महिन्यांत ४४१ कारवाया करत ७८६ आरोपी गजाआड

**७.८४ कोटींचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

नगर – जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) गेल्या तीन महिन्यांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १ मे ते ३१ जुलै या कालावधीत विविध प्रकारच्या ४४१ गुन्ह्यांचा छडा लावत, कारवाया करून ७८६ आरोपींविरूध्द कारवाई केली असून, तब्बल ७ कोटी ८४ लाख १२ हजार ७१५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विशेष मोहिम राबवून एलसीबीने धडक कारवाई केली. या कालावधीत दोन खुनांचे गुन्हे उघड करत पाच आरोपींना अटक केली, तर पाच दरोड्यांच्या गुन्ह्यांमध्ये २४ आरोपींना जेरबंद केले. दरोड्याच्या तयारीचे पाच गुन्हे उघड करून २५ आरोपींवर कारवाई करण्यात आली. याशिवाय २० जबरी चोरी, २० घरफोडी आणि १३ चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून, त्यामधून लाखो रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अवैध वाळू उपशाविरोधातील मोहिमेत ३० कारवाया करून तीन कोटी ६९ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आर्म ॲक्टअंतर्गत पाच कारवायांत नऊ आरोपींना अटक करण्यात आली.

मादक पदार्थांविरोधातील कारवाईत नऊ गुन्हे दाखल करून १२ आरोपींना अटक करण्यात आली, तर सेवनार्थी म्हणून ४० कारवायांत ४८ जणांवर कारवाई करण्यात आली. गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या ११ कारवायांमध्ये एक कोटी १० लाख २३ हजार ४८२ रूपयांचा माल जप्त करण्यात आला. गोमांस प्रकरणात ११ कारवाया करून ५२ लाख रूपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दारूबंदी कायद्यांतर्गत १५३ कारवाया करून १५५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले, तर जुगाराविरोधात ७७ कारवायांत ३०६ आरोपींवर कारवाई करण्यात आली. याशिवाय जीवनावश्यक वस्तू कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२, पाहिजे आरोपींचा शोध आणि न्यायालयीन वॉरंट बजावण्याची कामगिरीही स्थानिक गुन्हे शाखेने यशस्वीरीत्या पार पाडली.

### ५२ आरोपींवर प्रतिबंधात्मक केली कारवाई

सराईत गुन्हेगारांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अंतर्गत सहा टोळ्यांतील १५ जणांना हद्दपार करण्यात आले. कलम ५६ अंतर्गत नऊ प्रस्ताव मंजूर होऊन नऊ जणांना हद्दपार करण्यात आले. तसेच तीन आरोपींविरूध्द एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले असून चार मकोका प्रस्तावांमधील २५ आरोपींविरूध्द मकोका कायद्यांतर्गत मंजुरी मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून भविष्यातही अशाच प्रकारच्या धडक कारवाया सातत्याने सुरू राहतील असे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सांगितले.

# मुळा धरण ८३ टक्के भरले

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सध्या पाऊस सुरू आहे. या सुरू असलेल्या पावसामुळे धरणात पाण्याची जोरदार आवक होत असून, मुळा धरण सध्या ८३ टक्के भरले आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर असल्याने अहिल्यानगर शहरवासीयांची पाणीटंचाईच्या भीतीतून सुटका झाली आहे. येत्या १५ ऑगस्टपूर्वी हे धरण शंभर टक्के भरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अहिल्यानगर शहराला पिण्यासाठी मुळा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय, जिल्ह्यातीस तब्बल २२ पाणीपुरवठा योजना या धरणावर पूर्णपणे अवलंबून आहेत. त्यामुळे मुळा धरणाला दक्षिण जिल्ह्याची जीवनदायिनी म्हणून ओळखले जाते. धरणसाठा झपाट्याने वाढल्यामुळे शेतकरी वर्गासह नागरिकांमधून आनंद व्यक्त होत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील इतर महत्त्वाच्या धरणांमध्ये भंडारदरा आणि निळवंडे या धरणांचाही समावेश असून, तेथील पाणीसाठ्यातही वाढ होत आहे. भंडारदरा धरणाची पाण्याची पातळी ७४४.३६ मीटर असून, एकूण साठा ११ हजार ३९ दलघफू (उपयुक्त साठा १० हजार ७२९ दलघफू) आहे. धरणात उपयुक्त साठ्याची टक्केवारी ९७.१२% इतकी नोंदवली गेली आहे. धरणात आजची पाण्याची आवक २८२ दलघफू असून गेल्या २४ तासांत २५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

निळवंडे धरणाची पाणी पातळी ६५७.२५ मीटर असून, एकूण साठा ८ हजार ३३४ दलघफू (उपयुक्त साठा ८ हजार ७५ दलघफू) झाला आहे. निळवंडे धरणात उपयुक्त साठ्याची टक्केवारी ९६.८४% वर पोहोचली असून धरणात आज १६५ दलघफू पाण्याची आवक झाली आहे.

मुळा धरणाची पाणी पातळी ५५० मीटर असून, एकूण साठा २६ हजार दलघफू (उपयुक्त साठा २१,६०० दलघफू) आहे. या धरणात उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी ८०.६३% वर पोहोचली असून, एकूण पाणीसाठी ८३.९८ टक्के झाला आहे. धरणात आज २८० दलघफू पाण्याची झाली आहे. आढळा धरणाची पाणी पातळी ६७९.१० मीटर असून, एकूण साठा १ हजार ६० दलघफू असून, उपयुक्त पाणीसाठा ९७५ दलघफू आहे. हे धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्टला रॅली, पावरा नृत्य, लेझीम, सांस्कृतिक सोहळा


नगर – आदिवासी अस्मिता, परंपरा, शौर्य, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा अभिमानाने गौरव करणारा जागतिक आदिवासी दिन ९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर शहरात साजरा करण्यात येणार आहे. आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था आणि सकल आदिवासी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे आदिवासी एकता रॅली, सांस्कृतिक सोहळा, गुणवंत विद्यार्थी गौरव, सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार तसेच समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा आदिवासी समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

सकाळी १० वाजता पारंपरिक आदिवासी वाद्यांचा दणदणाट, भगवे व आदिवासी ध्वज, घोषणांचा उत्साह आणि राजा हरिश्चंद्र लेझीम पथक (कोहणे, ता. अकोले) यांच्या जोशपूर्ण सादरीकरणासह आदिवासी एकता रॅलीला प्रारंभ होईल. रॅलीदरम्यान माळीवाडा स्टँड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच वाडिया पार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी लेझीम पथकाचे थरारक सादरीकरण आणि आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थिनींकडून पारंपरिक पावरा नृत्य सादर करण्यात येणार असून, हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

दुपारी सामूहिक भोजनानंतर मुख्य कार्यक्रमास प्रारंभ होईल. प्रा. डॉ. माहेश्वरी गावित यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, आदिवासी समाजभूषण पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी गौरव, सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन असे विविध उपक्रम पार पडतील.

या सोहळ्याच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा समृद्ध इतिहास, परंपरा, लोककला, संस्कृती, शौर्य आणि सामाजिक ऐक्याचा संदेश संपूर्ण शहरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, हा कार्यक्रम अहिल्यानगरच्या सांस्कृतिक इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे यांनी तमाम आदिवासी समाजबांधव, युवक-युवती, महिला, विद्यार्थी तसेच अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, ही रॅली केवळ मिरवणूक नसून आदिवासी अस्मिता, परंपरा, शौर्य, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा जिवंत उत्सव आहे. पारंपरिक लेझीम, पावरा नृत्य, आदिवासी वाद्यांचा निनाद, सांस्कृतिक वैभव आणि समाजाच्या एकोप्याचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबासह उपस्थित राहावे.



मुक्ताई सेवादल फाउंडेशनच्या प्रमुख सारिका पन्हाळकर महोत्रा यांचा क्रेडाईकडून सत्कार करण्यात आला.

# अहिल्यानगरमधून 'आई' चळवळीला नवी दिशा

**ही चळवळ देशभर पोहोचविण्यासाठी क्रेडाईचा पाठिंबा**

नगर – महाराष्ट्रामध्ये विविध सामाजिक उपक्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि आता देशभर विस्ताराच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुक्ताई सेवादल फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आई चळवळीला अहिल्यानगरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवरांनी या चळवळीचे स्वागत केले.

मुक्ताई सेवादल फाउंडेशनच्या प्रमुख सारिका पन्हाळकर महोत्रा यांनी आई चळवळीची संकल्पना, तिच्यामागील सामाजिक भूमिका आणि ही चळवळ महाराष्ट्रातून संपूर्ण भारतात तसेच जगभर कशी पोहोचविण्यात येणार आहे, याचे प्रभावी सादरीकरण केले. आई, मातृत्व, कुटुंबव्यवस्था, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांना केंद्रस्थानी ठेवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा या चळवळीचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात क्रेडाई महाराष्ट्रचे मानद सचिव तथा क्रेडाई अहिल्यानगर सल्लागार परिषदेचे सदस्य आशीष पोखरणा यांनी आई चळवळीच्या संकल्पनेचे विशेष कौतुक करत या अभियानाचे अहिल्यानगर पालकत्व स्वीकारेल. समाजात मूल्याधिष्ठित परिवर्तन घडविण्यासाठी अशा चळवळींची आज नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात या अभियानाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

याप्रसंगी क्रेडाई अहिल्यानगरचे मानद सचिव दीपक बांगर, उपाध्यक्ष सागर गांधी, उपाध्यक्ष अमित वाघमारे, मानद खजिनदार विक्रम जोशी, संयुक्त खजिनदार अमित फिरोदिया, संचालक मयूर कोठारी, संचालक संदीप भापकर, क्रेडाई महाराष्ट्र युवा विंगचे सहसंयोजक व क्रेडाई अहिल्यानगर युवा विंगचे समन्वयक धवल इंगळे आदी उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी आई चळवळीची संकल्पना ही काळाची गरज असल्याचे सांगत या सामाजिक अभियानाला सक्रिय सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली.

महाराष्ट्रातून सुरू झालेली ही चळवळ संपूर्ण भारतात आणि पुढे जागतिक स्तरावर पोहोचून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ॲट्रॉसिटीच्या खटल्यातून ३ आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर– भारतीय दंड विधान आणि अनुसूचित जाती जमाती कायद्यान्वये दाखल असलेल्या खटल्यातून तीन आरोपींची न्यायालयाने गुणदोषावर निर्दोष मुक्तता केली आहे. जिल्हा तदर्थ न्यायाधीश पी.पी. देशपांडे यांनी हा निकाल दिला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, गदेवाडी ता.शेवगाव येथील महिला फिर्यादी समिंद्रा गुजर हिने शेवगाव पोलीस स्टेशन येथे काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल (सर्व रा. गदेवाडी ता.शेवगाव) यांचे विरुद्ध भारतीय दंड विधान आणि अनुसूचित जातीजमाती कायद्यानुसार जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून गुन्हा दाखल केला होता. सदर खटल्यात फिर्यादी ही चर्मकार समाजाची आहे तर आरोपी हे मराठा समाजातील आहेत अशी नोंद करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र डिवायएसपी सुदर्शन मुंढे यांनी दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी.पी.देशपांडे यांचे समोर झाली. फिर्यादीस तिची केस न्यायालयात पुराव्यासह सिध्द करता आली नाही. म्हणून सबळ पुरावा नसल्याने पुराव्या अभावी न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

आरोपीचे वतीने फिर्यादीस फिर्याद दाखल करण्यास झालेला उशिर, जातीवाचक शिवीगाळ करताना पाहिलेला प्रत्यक्ष नसलेला साक्षीदार तसेच फिर्यादी व आरोपी यांचेतील पूर्वीचे वाद याबाबी न्यायालयात सिद्ध केल्या. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकल्यानंतर फिर्यादीने दाखल केलेल्या खटल्यात भक्कम पुरावा कोर्टात आला नाही हे सिद्ध झाले म्हणून न्यायालयाने काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल यांची निर्दोष मुक्तता केली.

आरोपीचे वतीने ॲड. शिवाजी कराळे, ॲड. करुणा शिंदे, ॲड. सत्यजीत कराळे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. मोनाली कराळे, ॲड. दिप्ती शिंदे, ॲड. समिक्षा उनवणे आणि ॲड. विजय शिंदे यांनी सहकार्य केले.

